मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ३५ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर १९९८

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## आर्थिक विकास आणि भारताची बलस्थाने

- प्रतिष्ठानचे अध्यक्ष - **सुरेश सखाराम** (पृ. ३९९), मुंबई

आपले अर्थमंत्री श्री. यशवंत सिन्हा ह्यांनी मांडलेल्या अर्थ संकल्पावर उलट सुलट चर्चा अजूनहि चालू आहे. सर्वसाधारण असे मत आहे की सर्व अपेक्षा पूर्ण करणारा तडाखेबंद जरी हा अर्थसंकल्प नसला तरी सद्य परिस्थितीत कोणीही ह्यापेक्षा चांगला अर्थसंकल्प मांडू शकला नसता. अर्थात ह्या विचारांना राजकीय अस्थैर्याची छाया आहेच. अर्थमंत्र्यांनी सुचवलेल्या बऱ्याच तरतुदी चांगल्या आहेत; परंतु प्रत्यक्षात त्यांची अंमल बजावणी कशी होईल ही शंका सर्वांना भेडसावत आहे.

सर्व जगात व विशेषतः आपल्या आशिया खंडात होणारे बदल व स्थित्यंतरे लक्षात घेता भारताला जर प्रगती करून आपले स्थान टिकवायचे असेल तर काय करावयास हवे ह्याचा विचार होणे जरूरी आहे. त्या दृष्टीने विचार करतां मी भारताची बलस्थाने काय आहेत त्यांचा विचार करू लागतो. माझ्या दृष्टीने काही खालीलप्रमाणे आहेत.

१) इतर देशांशी तुलना करता आपल्याकडील पगार अजून खूप वाजवी आहेत. हे जरी आपण मान्य केले तरी शिस्त, उत्पादकता व तांत्रिक शिक्षण ह्यात सुधारणा होणे अत्यंत आवश्यक आहे.

२) भारताचा मोठा भूप्रदेश व प्रचंड लोकसंख्या ह्यामुळे आपली स्वतःचीच एक खूप मोठी बाजारपेठ आहे. ह्यामुळेच परदेशी कंपन्या त्यांची नवीन व नाविन्यपूर्ण उत्पादने व वस्तू घेऊन भारतात येण्यास उत्सुक आहेत. ही मागणी आपण भारतीय उद्योजकच नव्या वस्तु निर्माण करून पूर्ण करू शकू का? असा विचार करायला हवा. असे जर आपण करू शकलो तर आपली प्रगती कोणीच थांबवू शकणार नाही. अर्थात् इथे बनलेल्या मालाचा दर्जा ग्राहकाला योग्य तो मोबदला व समाधान देणारा असला पाहिजे.

३) जगभर आज संशोधन व नवनिर्मिती ह्यास फार महत्त्व देण्यात येत आहे. अशाप्रकारे मूलभूत संशोधन झाल्याशिवाय प्रगती होत नाही. परंतु असे संशोधन व त्यासाठी लागणारे तंत्रज्ञ ह्यांची किंमत परदेशात दिवसेंदिवस फार खर्चिक होऊ लागल्यामुळे त्यांना ती परवडत नाही. नासासारख्या अनेक संशोधन प्रशाळेत आपले भारतीय तंत्रज्ञ वेगवेगळ्या अधिकार पदावर काम करताना आढळतात. तरी अशा प्रकारच्या संशोधन व नवनिर्मितीची केंद्रे भारतात सुरू करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. असे झाल्यास ते तंत्रज्ञान तर भारतात उपलब्ध होईलच परंतु आपल्या युवा पिढीला येथेच कामाच्या संधी उपलब्ध होतील, व त्या कंपन्यानाही ते किफायतशीर होईल.

४) वरील गोष्टीप्रमाणे सॉफ्टवेअर निर्मितीसही फार महत्त्व आले आहे. संगणकाच्या प्रचाराबरोबर ह्याची गरज सारखी वाढणार आहे. तरी अशा कंपन्या भारतामध्ये स्थापन झाल्यास दोन महत्त्वाचे फायदे होतील. एक आपल्या तंत्रज्ञांना येथेच नोकरीच्या संधी उपलब्ध होतील व दुसरी ह्यामुळे होणारी निर्यात आपल्या परकीय गंगाजळीत प्रचंड भर घालू शकेल.

५) आपले एक आणखी बलस्थान आहे. आपल्याकडील प्रत्येक व्यक्तीला काहीना काही प्रकारे बचत करण्याची सवय आहे. बचत हे भांडवल उभारणीचे फार मोठे साधन आहे.

... पान नं. २ वर

मराठे प्रतिष्ठान

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

दर महिन्याच्या दुसऱ्या व गरजेनुसार चौथ्या शनिवारी कार्यकारी मंडळाच्या सभा होतात. त्या वेळी कोणीही कुलबांधव प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी सायं. ५ वाजतां प्रतिष्ठानच्या कार्यलयांत येऊ शकतो.

मागील तिमाहीत जून १३, जुलै ११ व ऑगस्ट ८ व २८ रोजी अशा कार्यकारी मंडळाच्या एकूण ४ सभा झाल्या.

१३ जूनच्या सभेत १२ वीच्या परीक्षेत पुणे बोर्डात सर्वप्रथम आल्याबद्दल पुण्याची कु. श्रध्दा विजय (पृ.९६) हिचे अभिनंदन करणारे पत्र पाठवण्याचे ठरवण्यांत आले. तसेच जुलैमध्ये उद्योग प्रवर्तन गटचर्चा घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला. ११ जुलै च्या सभेत, वार्षिक हिशेबपत्रके मंजूर करून ती चार्टर्ड अकौंटंट कडून तपासून घेण्याबाबतचा निर्णय झाला. तसेच २५ जुलै रोजी होणाऱ्या उद्योग प्रवर्तन गटचर्चेचा तपशीलवार कार्यक्रम ठरविण्यात आला. प्रतिष्ठानचे संस्थापक सदस्य श्री. वामन गणेश (पृ. ५०३) यांच्या "Brothers House" कल्पनेवर चर्चा झाली आणि याबाबत प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करावा असे ठरले.

८ ऑगस्टच्या सभेत ऑडिटेड हिशेब व वार्षिक अहवाल मंजूर करण्यात आले. तसेच २०.९.९८ रोजी सकाळी १० वाजतां वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचें ठरविण्यात आले.

२२ ऑगस्टच्या सभेत मागील वर्षीच्या (१४.९.९७) वा. सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांचा मसुदा मान्य करून तो २०.९.९८ च्या सभेत मंजुरीसाठी ठेवावा असे ठरविण्यात आले.

**उद्योगप्रेरणा गटचर्चा - २५.७.१९९८**

ब्राह्मण समाजातील तरुण वर्ग नोकरीचे दरवाजे बंद झाल्यामुळे हताश झाला आहे. उत्तम गुण मिळवूनसुध्दा मनासारखा अभ्यास, काम वा नोकरी मिळत नाही हे शल्य उरी बाळगून त्यांनी आपलं आयुष्य वाऱ्यावर सोडू नये म्हणून त्यांच्यामध्ये व्यवसायाची प्रेरणा निर्माण होणे ही काळाची गरज आहे. ही समस्या ध्यानी घेऊन प्रतिष्ठानने उद्योग प्रेरणा हा उपक्रम हाती घेतला.

या प्रयत्नांत लोकांकडून प्रतिसाद कितपत मिळतो हे जाणून घेण्यासाठी अंधेरी व मुलुंड येथे दोन मेळावे आयोजित केले. प्रतिसाद उत्तम. उत्साह ओसंडून जाण्याएवढा. पण अखेर ते मेळावेच होते. चावी फिरवून गाडीचे इंजिन चालू करण्यासारखेच होते. इंजिन चालू झाल्यानंतर गाडीला वेग व निश्चित दिशा देणं ही पुढची पायरी. या दृष्टीने नुसते उत्साही नव्हे तर खरोखर व्यवसायात शिरू पाहणारे किंवा व्यवसायात असून मार्गदर्शनाची इच्छा बाळगणारे तरुण व अनुभवी मार्गदर्शक यांची गटचर्चा २५ जुलै १९९८ रोजी आयोजित करण्यात आली.

आमच्या या पहिल्या गटचर्चेसाठी आम्हाला डॉ. घाटणेकर, श्री. हेमंत मराठे व श्री. रणजित मराठे यांसारखे व्यवसाय धुरंधर मार्गदर्शक म्हणून लाभले हा तर शुभशकूनच मानावा लागेल.

परस्पर ओळखीनंतर उपस्थित इच्छुकांनी आपल्या अपेक्षा अगदी मोजक्या शब्दात व्यक्त केल्या. हे सर्वजण व्यवसायात स्थिरावलेले पण अधिक मार्गदर्शन म्हणा वा एखाद्या जोडव्यवसायाची माहिती जाणू इच्छिणारे होते. त्यानंतर व्यवसायांत शिरू इच्छिणाऱ्या तरुणांनी आपले मनोगत थोडक्यात सांगितले. या अपेक्षांच्या अनुषंगाने मार्गदर्शकांची भाषणे झाल्यानंतर प्रश्नोत्तर रूपाने परस्पर चर्चा रंगली. या कार्यक्रमाचा वृत्तांत स्वतंत्रपणे याच अंकात छापलेला आहे.

**हितगुज**

३१ मार्च १९९८ रोजी संपलेल्या वर्षात प्रामुख्याने रत्नागिरी संमेलनामुळे हितगुज वर्गणीदार नोंदणीस आणि हितगुज निधी देणग्यांस चालना मिळाली. वर्षभरात ११९ नवीन तहहयात वर्गणीदार झाले. याबबरोबर वर्षभरात ८९ कुलबांधव प्रतिष्ठानचे आजीव सभासद झाले, दोन आश्रयदाते सदस्य झाले आणि एक हितचिंतक सदस्य झाला.

**वर्षभरातील देणग्या :**

३१ मार्च १९९८ रोजी संपलेल्या वर्षांत प्रतिष्ठानला निरनिराळ्या कारणांसाठी खालीलप्रमाणे कुलबांधवांकडून देणग्या मिळाल्या -

**हितगुज निधीसाठी (एकूण रु. ६९५०)**

| | |
|---|---|
| १) अरविंद शंकर मराठे, अमेरिका | ४५४८ |
| २) सुरेश पांडुरंग मराठे, रत्नागिरी | १००० |
| ३) दिनकर मुकुंद मराठे, पुणे | ४०० |
| ४) सौ. अनुराधा द. केळकर, रत्नागिरी | ३५१ |
| ५) गोपाळ दामोदर मराठे, कराड | २०१ |
| ६) शिवानंद दिवाकर मराठे, गोवा | २०० |
| ७) सदानंद प्रभाकर विद्वांस, कर्जत | २०० |
| ८) दत्तात्रय आत्माराम मराठे, मुलुंड | ५० |

**शिक्षण निधीसाठी (एकूण रु. २६७०७)**

| | |
|---|---|
| १) सुरेश गोविंद मराठे, माटुंगा | ११००० |
| २) रामचंद्र पुरुषोत्तम जोशी, बोरीवली | ५००० |
| ३) विष्णु नारायण मराठे, बांद्रा | २५०० |
| ४) मधुकर रामचंद्र चक्रदेव, डोंबिवली | २००० |
| ५) अरविंद दामोदर मराठे, डोंबिवली | २००० |
| ६) चिंतामण माधव मराठे, परळ | १००१ |
| ७) यमुनाबाई लक्ष्मण मराठे, रत्नागिरी | १००१ |
| ८) माधव भार्गव मराठे, रत्नागिरी | ५०१ |
| ९) सदानंद गोपाळ जोशी, ठाणे | ५०१ |
| १०) प्रकाश गणेश विद्वांस, अहमदाबाद | ५०१ |
| ११) श्रीनिवास केशव मराठे, ठाणे | ५०० |
| १२) चिंतामण बळवंत मराठे, पुणे | १०१ |
| १३) गजानन चिंतामण मराठे, परळ | १०१ |

**... भारताची बलस्थाने** (पान नं. १ वरून)

परदेशात प्रत्येक वस्तु कर्जाने हप्तापध्दतीवर घेण्याची सवय असल्यामुळे त्यांची बचत होतच नाही.

६) सेवा व्यवसायाला निर्माण झालेले अनन्यसाधारण महत्त्व आपण ह्यापूर्वी विचारांत घेतले आहेच. त्याची व्याप्ती ह्या अर्थसंकल्पामुळे आणखी वाढणार आहे. कारण विमा व्यवसाय आता सरकारी रहाणार नसून तो सुरू करण्यास भारतीय कंपनीस मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे ह्या व्यवसायाशी निगडित अनेक सेवा व्यवसाय लागणार आहेत.

७) वरील सर्व बलस्थानांचा, ती वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाल्यास हा अर्थसंकल्प नक्कीच परिणामकारक होईल. परंतु ह्याच बरोबर भारत हा मुख्यत: शेतीप्रधान देश आहे. चांगला पाऊस पडणे हेच आपणाला ताकद देणारे आहे. शेती सुध्दा यांत्रिकीकरणाने करून वाया जाणारे धान्य व इतर बागायती फळे-भाज्या ह्यांची काळजी घेतल्यास भारत सुजलाम् सुफलाम् होण्यास वेळ लागणार नाही, असा विश्वास वाटतो.

ooo



Marathe Pratishthan

# सभासद वृत्त

**पुणे बोर्डात १२ वीत सर्वप्रथम**

**कु. श्रध्दा विजय (पृ. ९६) - आशिष पेंडसे**



सायकलने पिंपरी गाठायची... तिकडून बसने पुणे ... दिवसभर एकाग्रतेने अभ्यास... कॉलेज, क्लास उरकून पुन्हा बस अन् सायकलचा प्रवास. उन्हाळा, थंडी, पावसाळा काशाचीही पर्वा न करता पिंपरी-चिंचवड परिसरातील हजारो विद्यार्थ्यांचे हे चक्र सुरूच असते. त्यापैकीच एका विद्यार्थिनीला 'तो' गोड निरोप आला अन् या सर्व कष्टांचा, परिश्रमांचा विसर पडला. 'ती' विद्यार्थिनी आहे श्रध्दा विजय मराठे अन् 'तो' निरोप आहे बारावी परीक्षेत पुणे विभागात सर्वप्रथम आल्याचा!

पुण्यातील लक्ष्मणराव आपटे प्रशालेच्या श्रध्दाने ६०० पैकी ५७६ गुण मिळवून (९६ टक्के) बारावीत पुणे विभागात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. विभागात मुलींमध्ये पहिली व व्यावसायिक अभ्यासक्रमातही पहिली, असे तिहेरी यश तिने प्राप्त केले आहे. महाराष्ट्रातील आठही विभागीय मंडळांत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये PCM मध्ये श्रध्दाला सर्वात जास्त म्हणजे ३०० पैकी २९९ गुण आहेत. वास्तविक श्रध्दाला अशा प्रकारचे यश काही नवीन नाही. दोनच वर्षापूर्वी दहावीत तिने गुणवत्ता यादीत चौदावा क्रमांक पटकविला होता.

खरं तर, दहावीनंतर कॉलेजमध्ये 'ऐश' करायला मिळणार म्हणून अनेक जण सुखावतात. श्रध्दाने मात्र हा निर्णय जाणीवपूर्वक घेतला. ती म्हणते कॉलेजमधील 'त्या' वातावरणाला मुकले, असे मला कधीही वाटले नाही. त्यापेक्षा प्रशाळेतील शालेय व शैक्षणिक वातावरणाचा मी पुरेपूर आनंद लुटला. प्रशालेत घेण्यात येणाऱ्या टेस्ट, आई-वडील, शिक्षकांचे परिश्रम यामुळेच मी एवढे मोठे यश मिळवू शकले, असेही ती प्रांजळपणे सांगते. श्रध्दाचे वडील विजय मराठे हे टेल्कोत अभियंते आहेत, तर आई कल्पना मराठे या घर सांभाळतात.

संगणक अभियांत्रिकी अभ्यासक्रम शिकणारी श्रध्दा पुस्तकी किडा नाही बरं का! वाद-विवाद स्पर्धा, क्वीझ, वक्तृत्व स्पर्धांमध्ये तिला विशेष रस आहे. तिचे वाचनही दांडगे आहे. पी. जी. वूडहाऊस हा तिचा आवडता लेखक. बारावीच्या वर्षात मात्र तिने आपले छंद, आवडी थोड्या बाजूला ठेवल्या. पण टीव्ही, छे! टीव्हीसमोर बसून गणिते सोडविणे हे तर तिचे वैशिष्ट्य.

बी. ई. झाल्यानंतर शक्य तर परदेशात जाऊन एम. एस. करण्याची श्रध्दाची महत्त्वाकांक्षा आहे. **(आभार-लोकसत्ता, पुणे १२-६-१९९८)**

**मुंबई बोर्डात कर्णबधिरात दुसरी - स्वाती विष्णू (पृ. १५९)**



चि. स्वाती ही जन्मतःच तीव्र कर्णबधिर आहे. त्यावर कोणताच इलाज नसून कर्ण-बधिरांच्या शाळेत लवकरात लवकर प्रवेश मिळवणे हाच उपाय असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यानुसार 'विकास विद्यालय (दादर)' या शाळेत तिला सहा महिन्यांची असतानाच घातली व तिचे शिक्षण सुरू झाले. तिला आवाजाचे ज्ञान प्रथमपासूनच देण्यात आले.

शाळेत फक्त अभ्यासच नव्हे तर नाच, चित्रकला, अभिनय याचेही शिक्षण देण्यात आले. शाळेतून सहली काढण्यात येत. शाळेच्या स्नेहसंमेलनात स्वाती भाग घेत असे. आम्हीदेखील स्वातीला सर्व कार्यक्रमांना घेऊन जातो. त्यामुळे ती कर्णबधिरत्वाचा न्यूनगंड न बाळगता सर्वांमधे सहजपणे मिसळू शकते.

तिला नाचाची आवड आहे. ती पाचवीत असल्यापासून श्रीमती जया बच्चन यांच्या ISRH(Indian Society for Rehabilitation of Handicapped) संस्थेत जाते. यामधे रामायण, कृष्णलीला, देवी यासारखे बॅले-डान्स बसवण्यात आले. ISRH संस्थेतर्फे २ वर्षांपूर्वी ती अमेरिकेला जाऊन आली. अमेरिकेमध्ये ऑरलॅन्डो, न्यूयॉर्क इ. ठिकाणी त्यांचे नाचाचे कार्यक्रम झाले. या कार्यक्रमामध्ये सर्वजण कर्णबधिर, मतिमंद, पोलिओग्रस्त असे अपंगच होते. तरीदेखील त्यांची अमेरिका सफर अतिशय यशस्वीरित्या पार पडली.

यंदा स्वातीला दहावीत ७१.०६% गुण मिळाले व ती तिच्या शाळेतून पहिली व कर्णबधिरांमधून दुसरी आली. तिच्या या यशामध्ये शाळेचे प्रयत्न, तिची मेहनत यांचा मोठा वाटा आहे. अतिशय लहानपणापासून शाळेत घातल्यामुळेच हे यश ती मिळवू शकली. पुढे तिला वाणिज्य शाखेत प्रवेश हवा आहे.

तिचा ब्युटिशियन चा कोर्स झालेला आहे. शाळेतल्या कॉम्प्युटर कोर्सलाही ती जाते. तिचा हा सर्वांगीण विकास शाळेने तिच्यावर घेतलेली मेहनत, तसेच तिचे प्रयत्न ह्यामुळेच शक्य झाला आहे.

**- सौ. वसुधा विष्णू** (पृ. १५९), दादर, मुंबई.

**गोवा बोर्डात ४३ वा अजित अशोक**

गोव्यातील (कुर्टी, फोंडा) सभासद अशोक रामचंद्र (पृ. १८८) यांचा मुलगा अजित याने १९९८ मार्च मधे झालेल्या १०वीच्या परीक्षेत ७५० पैकी ६७१ (८९.४८ टक्के) गुण मिळवून गोवा बोर्डात गुणवत्ता यादीत ४३ वा क्रमांक मिळवला.

**प्रतिष्ठान वृत्त** (पान २ वरून)

**अनिता खांबेटे स्मृति पारितोपिकांसाठी**

| | |
|---|---|
| **सीताराम गोपाळ खांबेटे, अंधेरी यांजकडून** | **१०७५३** |

**वैद्यकीय मदत निधीसाठी**

| | |
|---|---|
| **रामचंद्र पुरुषोत्तम जोशी, बोरीवली यांजकडून** | **५००१** |

**खुडीपाट पूरग्रस्त निधीसाठी (एकूण रु. ५००१)**

| | |
|---|---|
| १) नारायण परशुराम मराठे, कल्याण | २५०० |
| २) अशोक यशवंत मराठे, डोंबिवली | १००० |
| ३) सुरेश सखाराम मराठे, माहीम | १००० |
| ४) पांडुरंग परशुराम मराठे, बोरीवली | ५०१ |

**कायम निधीसाठी (एकूण रु. ६७००)**

| | |
|---|---|
| १) शंकर कृष्णाजी मराठे, दादर | ५००० |
| २) अरुण गणेश मराठे, बोरीवली | १२०० |
| ३) लक्ष्मण पांडुरंग मराठे, गोवा | ५०० |

**अन्य देणग्या (एकूण रु. १६५१)**

| | |
|---|---|
| १) गणेश विनायक मराठे, दादर | १००० |
| २) लक्ष्मण गणेश मराठे, पुणे | ५०० |
| ३) अनंत रामचंद्र मराठे, दादर | १०१ |
| ४) सुधीर चिंतामण विद्वांस, औरंगाबाद | ५० |

ooo

Marathi Pratishthan

### १२ वीत ९२.१७ टक्के गुण मिळवणारा - रोहित प्रमोद



पुण्यातले सभासद प्रमोद विष्णू (पृ. ५१३) यांचा मुलगा रोहित याने १९९८ मधे झालेल्या पुणे बोर्डाच्या १२ वीच्या परीक्षेत ९२.१७ टक्के गुण मिळवले. त्याचा गुणवत्ता यादीतला क्रमांक ३ मार्कांनी हुकला. त्याने PCM मधे ९७ टक्के गुण मिळवले. १०वीतही रोहितने ८८ टक्के गुण मिळवले होते. तसेच १९९६ मधे त्याने नॅशनल टॅलेंट सर्च स्कॉलरशिपही मिळविली आहे.

### गोवा विद्यापीठांत ३ री - चेतना मराठे



मराठे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष गणेश विनायक (पृ. ११५) यांची नात चेतना श्रीहरी हिने गोवा विद्यापीठाच्या जून १९९८ मधील B.E. (Electrical) परीक्षेत २४५०पैकी १८८० गुण (७७ टक्के) मिळवून या विद्याशाखेत विद्यापीठात ३ रा क्रमांक मिळवला.

### ऑईल टेक्नॉलॉजीमधे सर्वप्रथम रवींद्र पद्माकर

जून १९९८ मधे झालेल्या नागपूर विद्यापीठाच्या B.Tech Chemical Technology (Oil and Paints) या परीक्षेत नागपूरमधील सभासद पद्माकर नरहरि (पृ. २५६) यांचा मुलगा रवींद्र याने १५०० पैकी १२२८ (म्हणजेच ८१.८६ टक्के) गुण मिळवून नागपूर विद्यापीठात Oil Technology विषयांत प्रथम क्रमांक मिळवला. तो पाताळगंगा येथील रिलायन्स इंडस्ट्रीजमधे ग्रॅज्युएट ट्रेनी इंजिनिअर म्हणून काम करीत आहे.

### सुरेशभाऊंची षष्ठ्यब्दिपूर्ती

प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश सखाराम (पृ.३९९) यांनी १०.९.१९९८ रोजी ६१व्या वर्षात पदार्पण केले. सुरेशभाऊंच्या 'प्रकृति'धर्माला अनुसरून त्यांच्या सुना-मुलां-नातवंडांनी कोणत्याही प्रकारचा डामडौल न करता षष्ठ्यब्दिपूर्तीचा कौटुंबिक समारंभ अतिशय साध्या पद्धतीने साजरा केला. त्यांच्या स्विफ्ट उद्योगाने वर्षभरापूर्वीच अमेरीकन कंपनीच्या सहकार्याने संपूर्ण आशियाच्या बाजारपेठेसाठी स्विफ्ट ऑफसेट छपाई यंत्रांचे उत्पादन नाशिक येथील कारखान्यात सुरू केले आहे. साठीतही तरुणाला लाजवील अशा धडाडीने सुरेशभाऊ आता आंतरराष्ट्रीय बाजारातही मुशाफिरी करीत आहेत.

सुरेशभाऊंना दीर्घायुरारोग्य लाभो अशा सर्व कुलबांधवांतर्फे सदिच्छा! जीवेत शरदः शतम्!

### १०वीत शाळेत सर्वप्रथम-कु. रश्मी श्रीकांत काळे



प्रतिष्ठानचे सभासद **दत्तात्रय आत्माराम** (पृ.३२६) यांची नात (मुलीची मुलगी) **कु. रश्मी श्रीकांत काळे** हिने मुंबई बोर्डाच्या १०वीच्या परीक्षेत ८९.८० टक्के मार्क मिळवले. मुलुंड - मुंबईच्या व्हि. पी. एम्. शाळेत तिने पहिला क्रमांक मिळवला.

### नांदा सौख्यभरे

वाडा जि. ठाणे येथील सभासद **भास्कर दत्तात्रय** (पृ. २१ - दत्तात्रेय विष्णू यांचे पुत्र) यांची मुलगी **भारती हिचा विवाह** नाशिकचे **हरिष पाठक** यांचेशी दि.८.५.१९९८ रोजी संपन्न झाला.

### सहवेदना

१) कोल्हापूर येथील कुलबांधव **कमलेश रामचंद्र** यांचा पुत्र **राजेश** (पृ. ११९) याचे १५.२.९८ रोजी अवघ्या १८व्या वर्षी निधन झाले.

२) केळशी येथील मराठे प्रतिष्ठानचे सभासद **सुभाष वामन विद्वांस** (पृ. ८६४) यांचे एप्रिल १९९८ मधे सर्पदंशाने निधन झाले.

३) मराठे प्रतिष्ठानचे पाली, सुधागड येथील कुलबांधव प्रसिध्द नारदीय कीर्तनकार **सुंदरबुवा मराठे** (बाळकृष्ण) विष्णू (पृ. १७०) हे १२-५-१९९८ रोजी स्वर्गवासी झाले. ते ८५ वर्षांचे होते.

४) प्रतिष्ठानचे सभासद **श्री. विनेश काशिनाथ** (पृ. ४०४) यांचे वसई येथे नवीनच घेतलेल्या जागेत मेंदूच्या विकाराने ६ जून १९९८ रोजी अवघ्या ३७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी व लहान मुलगा आहे. रसकुमारी या आयुर्वेदिक औषधाचे उत्पादक श्री. काशिनाथ भास्कर व त्यांची पत्नी उमा यांच्या वृध्दापकाळात त्यांचा एकुलता एक पुत्र जावा हा त्यांच्यावर मोठाच आघात आहे. ईश्वर त्यांना धैर्य देवो व मृतात्म्यास शांती देवो!

५) दादर, मुंबई येथील प्रतिष्ठानच्या सभासद **सौ. अर्चना अरविंद परांजपे** (पृ. ५६३ व्यंकटेश नारायण यांची मुलगी) या ४.७.९८ रोजी कर्करोगाने परलोकवासी झाल्या.

६) मिरज येथील सभासद **राजीव बाबुराव मराठे** (पृ. ४८१) यांचे वयाच्या अवघ्या ४७ व्या वर्षी दि. १७.८.१९९८ रोजी दुःखद निधन झाले.

OOO

## मायेचा वटवृक्ष (पृ. ५ वरून)

त्याची सुविद्य पत्नी (संजीवनी), ३६ वर्षे वय तिचे. तिच्यावर जणू दैवाने घालाच घातला. आयुष्याच्या अर्ध्या वाटेवरच तिला पती वियोगाचे दुःख सहन करावे लागले. मुलगा ओंकार अतिशय हुषार व बुद्धिमान. अवघ्या १५ वर्षाचा व १०वी च्या परीक्षेला बसणारा. दोनच दिवसांनी १०वी ची परीक्षा द्विधा मनःस्थितीतच त्याने दिली. धाकटी मुलगी आरती. सर्वांना हवीहवीशी वाटणारी व वडिलांची अतिशय लाडकी. एवढ्या लहानपणीच त्यांचे पित्याचे छत्र हरपले. सर्व कुटुंबच शोकमय झाले. आणि ह्या सर्वांचे आधारस्तंभ बापू! त्यांना वयाच्या ७१ व्या वर्षी पुत्रशोक झाला. त्यांच्या सुखी संसाराला लागलेले ते एक गालबोटच!!

OOO

### सौ. कुंदा गणात्रांचा कुलबांधवांना देकार

सौ. कुंदा गणात्रांनी मराठे कुटुंबियांना डोळ्याचा नंबर मोफत काढून देण्याचे ठरविले आहे. तसेच Vision aid या त्यांच्या विभागाकडून चष्मा घेतल्यास त्यांतही १० टक्के सूट देण्याचे ठरविले आहे. **फोन :** (गिरगाव) ३८२०४०९
पुणे (नारायण पेठ) ४५७०३१
(महिन्यातला १ला व ३रा शनिवार, रविवार)



Marathe Pratishthan

# 'मायेचा वटवृक्ष' - रामचंद्र पुरुषोत्तम (पृ. ७४७)

**- श्रीमती शुभदा पांडुरंग जोशी** (पृ. ७४७), बोरिवली, मुंबई

***कुटुंबातला बापू हा आम्हा सर्वांचा मोठा आधारस्तंभ - एवढे मोठे आघात सहन करून सुद्धा उभारीने उभा राहाणारा वटवृक्षच. सर्वांना सावली माया व प्रेम देणारा.***

बापू शून्यात बघत बसले होते. ज्यांना आयुष्यात कधी दुःख माहीत नाही अशा त्या बापूंवर दुःखाचा मोठा डोंगरच कोसळला. आधी धाकटी बहीण सुशिला (२३.५.९७), नंतर मोठा भाऊ केशव (२८.९.९७), त्या पाठोपाठ धाकटा भाऊ पांडुरंग (३.२.९८) व शेवटी, कळस म्हणजे त्यांचा धाकटा मुलगा शरद (२५.३.९८) ह्या सर्वांचे एका पाठोपाठ निधन झाले. केवढा मोठा आघात त्यांच्या मनावर झाला. वज्राहून कठोर असलेले बापू कोसळून पडतील नाहीतर काय? पण तशातच त्यांनी सर्वांची क्रियाकर्मे केली. बापूंनी ज्यांच्यावर माया केली ती सर्वजणं त्यांच्या मायेला पारखी झाली.

बापूंचे लहानपण गरिबीतच गेले. वडील आजारी झाल्यामुळे ते सावंतवाडी सोडून मुंबईला नोकरीच्या शोधात आले. आईपण आजारीच असायची. बापूंना रेल्वेत नोकरी लागली व सर्व कुटुंबाचा भार त्यांनी हसतमुखाने उचलला. सर्व भावंडे मिळून कामे करायची, एकमेकांना मदत करायची व गुण्यागोविंदाने एकत्र नांदायची.

वयाच्या चोविसाव्या वर्षी बापूंचे लग्न झाले. सुशील व प्रेमळ पत्नी त्यांना मिळाली. बापूंनी नोकरी सोडून धंदा सुरू केला. पत्नीच्या पायगुणाने पैसा मिळत गेला. धंद्यात भरभराट झाली. गरीबी संपली व सुखाचा संसार सुरू झाला. तीन वर्षात दोन मुलगे झाले. रवी व उदय जणु जुळे भाऊच. त्यानंतर मुलीची हौस फिटली (संध्या) व शेवटचा शरद (शेंडेफळ).

लक्ष्मी व सरस्वती ह्या दोघी एकत्र नसतात असे म्हणतात. पण इथे तर लक्ष्मी व सरस्वती हातात हात घालून त्यांच्या स्वागतास उभ्या होत्या. मुले हुषार निघाली. शिकून सवरून मोठी झाली. सर्वांची लग्ने झाली. बापूंनी सर्वांना जागा घेऊन स्वतंत्र संसार थाटून दिले. सुनांना तर ते मुलींप्रमाणेच वागवीत. पुढे नातवंडे झाली. सगळ्यांचे वाढदिवस ते एकत्र जमून हौशी मौजेने साजरा करीत. संसारात त्यांना कशाची ही उणीव भासली नाही की कमतरता नाही. दुःख हे त्यांना आयुष्यात कधी माहीतच नाही. नेहमी आनंदाने व हसतमुखाने ते उभयतां, येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करतात. अशी वयाची ७१ वर्षे त्यांची सुखात गेली.

आणि अचानक दैवाने घाला घातला. डिसेंबर १९९७ महिन्याच्या सुरवातीसच शरदच्या न बऱ्या होणाऱ्या आजाराची चाहुल लागली. सगळ्यांच्या तोंडचे पाणीच पळाले. शरदचे वय ४१-४२ वर्षे संसाराच्या सारीपटावरील डाव अर्ध्यावरच उधळला गेला. शरद एक उमदे व्यक्तिमत्व. मनाने प्रेमळ व उदार. दुसऱ्यांना मदत करण्याची वृत्ती. जनसंघाचा एक कार्यकर्ता. अशा ह्या शरदला त्या आजाराने पोखरले हे ऐकून सर्वांना धक्काच बसला. टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधे सर्व प्रकारच्या तपासण्या झाल्या. निदान नक्की झाले.

१ जानेवारी १९९८ ला ऑपरेशन झाले. त्याला कळून चुकले होते की आपण यातून बरे होणार नाही. पण तरीही तो आयुष्याच्या एकेक क्षणाशी निकराने झुंज देत होता. बिचारा पार कोसळून गेला होता. मूकपणाने सर्व दुःख मनातल्या मनात गिळत होता. अनंत यातना भोगत होता. आई, वडील, पत्नी, बहीण, भावंडे, भावजया सर्वजणं आळीपाळीने जागून त्याची सेवा करत होते, मनात एकच आशा बाळगून की तो लवकर बरा व्हावा. माणूस हा आशेवर जगतो. असाध्य रोग माहीत असूनही प्रयत्नात कुठलीही कमतरता ठेवली नाही. गंडे-दोरे, साधू-संत, जो जे म्हणेल ते ते सर्व उपाय चालू होते. घराचे जणू हॉस्पिटलच झाले होते. रोज माणसे भेटावयास येत व दिलासा देऊन जात.

त्याचवेळी बापूंचा धाकटा भाऊ पांडुरंग आजारी होता. बापू बिचारे दिवसभर मुलाची सेवा करून परत भावाची सेवा करायला हसतमुखाने संध्याकाळी यायचे. रोज यायचे. एक दिवस जरा उशीर झाला तरी भाऊ लगेच फोन करायचा. तसेच बिचारे लगेचच धावत यायचे. त्यांचे वय आहे का ही धावपळ करायचे. पण मायेपोटी, प्रेमापोटी ते सर्व दुःख मनातल्या मनात गिळत होते. व सर्व सहन करत होते. पण अचानक ३ फेब्रुवारी १९९८ रोजी धाकटा भाऊ पांडुरंग याला देवाज्ञा झाली व तो हे जग सोडून गेला.

आणि अखेर ती काळरात्र उजाडली. भयाण पहाट झाली. रविवार १५ मार्च १९९८. रात्रभर उशाशी बसून शेवटी डुलकी लागली. आणि जाग आली व पहातात तो शरदची जीवन ज्योत मालवली होती. घरात शोकाकुल वातावरण पसरले. सर्वांना ही दुःखद बातमी समजताच सर्वजण हळहळले. केवढा मोठा जनसमुदाय त्यांच्या अंत्ययात्रेला जमला होता. प्रार्थना करत होता की त्याच्या आत्म्याला चिरशांती लाभो.

(पुढील मजकूर पृ. ४ वर)

## 'पांडुरंगा' ची अखेरची (?) इच्छा

आपल्या धीराच्या दिराची, ओळख करून देणाऱ्या शुभदा पांडुरंग त्यांच्या पतीसह मराठे प्रतिष्ठानच्या ऑक्टोबर १९९७ मधील रत्नागिरी संमेलनाला उपस्थित होत्या. संमेलनानंतर पांडुरंग पुरुषोत्तम यांचे पत्र आले - ''माझा जन्म सावंतवाडीचा. माझी एक इच्छा होती ती म्हणजे माझी जन्मभूमी पाहण्याची. आम्ही रहात होतो ते घर व आजुबाजुचे शहर 'याचि देहि याचि डोळा' मी पाहून आलो. वयाच्या ६ व्या वर्षी मी सावंतवाडी सोडली. ५५ वर्षांनी मी परत सावंतवाडी पाहिली. हे 'प्रतिष्ठान' मुळेच साध्य झाले. हा एक माझ्या आयुष्यात आलेला भाग्याचा क्षणच आहे असे मी समजतो.''

**हा 'भाग्याचा क्षण' अगदी शब्दशः क्षणभंगुर ठरावा हा किती विचित्र योगायोग! -संपादक**



Marathe Pratishthan

# अमृत महोत्सवी नाना - गणेश परशराम

**- सौ. सुहासिनी नारायण (पृ. १८)**, कल्याण



सकाळची वेळ. 'अहो आजोबा, मला गुलाबाचे फूल द्या ना.' 'देतो हं' 'अरे नाना, प्राजक्ताची फुले ठेवली आहेस का?' १०८ प्रकारची फुले वाहणाऱ्या सौ. चंद्राताई सोमण (ती. नानांची बहीण) यांची विचारणा. इतक्यात दारात 'स्वर्ग सोपान' चे सामान नेण्यासाठी दूरवरून कोणीतरी लोक आलेले असतात. श्री. नाना अंगण झाडण्यासाठी हातात घेतलेला खराटा तूर्त बाजूस ठेवून सर्वांच्या मागण्या तत्परतेने पूर्ण करतात. नित्याची कामे नियमित करून वाढीव कामांसाठीही त्यांचा दिनक्रम असाच सुरू होतो.

तर असे हे आमचे 'नाना' (श्री. गणेश परशराम - पृ. १८). माझे नं. २ चे भावोजी. एकूण ७ भाऊ व३ बहिणी अशा मोठ्या एकत्र कुटुंबात मी नं. ४ ची सूनबाई. पण ह्या दिरांना भावोजी असे कोणीच म्हणत नसल्यामुळे आम्हीही त्यांना 'नाना'च म्हणतो. कै. आई वडिलांचा मात्र हा लडका गणू आहे. आई वडिलांचे लाडके होण्यास त्यांचेही गुण तसेच होते. आज्ञाधारक कसे असावे तर त्यांच्याकडे बोट दाखवता येईल. माणूस कुठेही मोठा होतो, आवडता होतो तो त्याच्या गुणांमुळेच. श्री. नानांचा जन्म गणेशचतुर्थीचा. १९९७ च्या गणेशचतुर्थीला त्यांनी ७५व्या वर्षात पदार्पण केले.

१० माणसाच्या कुटुंबात २ नं. चा भाऊ म्हणून त्यांच्या वर जबाबदारीही बरीच पडली. घरात नेहमी १/२ जनावरे असायची. (गाय, म्हैस) त्यांचे दूध काढण्यापासून ते शेणगोठ्यापर्यंत सर्व कामे ते नियमित करीत असत. एकीकडे शिक्षण चालू. शाळेत इतिहास आवडता विषय. त्यांचे शिक्षक श्री. सी. व्ही. भिडे त्यांच्या उत्तरावर खुष असायचे. त्यांचे पेपर्स ते इतर मुलांना वाचून दाखवीत असत. कारण उत्तरे मुद्देसूद व [illegible]पूर्ण असत. मॅट्रिकपर्यंत शिक्षण झाल्यावर [illegible]च्या संसाराला हातभार म्हणून सेंट्रल रेल्वेत नोकरी धरली.

रेल्वेतही त्यांचे काम अत्यंत शिस्तबद्ध व चोख होते. त्यामुळे वरिष्ठ अधिकारीही त्यांच्यावर खुष असत. १९५० मध्ये त्यांना हिशेब तपासनीस म्हणून बढती मिळाली. त्यानिमित्ताने त्यांचा भारतभर प्रवास झाला. अनेक प्रेक्षणीय, ऐतिहासिक स्थळे, किल्ले पाहावयास मिळाली. त्याचाही त्यांनी अभ्यास केला. हिशेब तपासताना जरा चूक नजरेत आली तरी ती वरिष्ठांपर्यंत दाखविली जायची. त्यामुळे त्यांच्या कामाचा एक प्रकारचा दरारा होता.

लहानपणापासून शाखेत जायची सवय आणि व्यायामाची आवड यामुळे शरीरही त्यांना उत्तम साथ देत असे. अजूनही त्यांचे नमस्कार, जोर/बैठका चालू आहेत. श्री. नानांचे लग्न १९४८ साली २० मे रोजी झाले. सुदैवाने त्यांना पत्नीही सुस्वभावी व सहकार्य करणारी मिळाली. खरोखरीच सहचरी असावी तर अशी.

सेवानिवृत्त झाल्यानंतर मात्र त्यांनी समाजसेवेला वाहून घेतले. त्याचे बाळकडू वडिलांकडून मिळाले होते. श्री. ल. शं. काळे ह्यांच्या सांगण्यावरून त्यांनी कल्याणच्या ब्राम्हण सभेस वाहून घेतले. सिद्धेश्वर मंदिराच्या समितीवर त्यांची नियुक्ती झाली. 'स्वर्ग सोपान मंडळा'चेही ते निष्ठेने काम करू लागले. अजूनही हे सर्व चालू आहे. ह्या कार्यासाठी 'समर्थ ज्ञानदीप मंडळा'ने त्यांचा बहुमान केला. ब्राम्हण सभेच्या कार्यात ते समरस झालेले दिसतात. मग त्या 'सामुदायिक मुंजी' असोत अथवा 'ज्येष्ठ नागरिक अभीष्टचिंतन' असो. ते स्वतः कानाकोपऱ्यांत हिंडून माहिती काढून ऑगस्टमध्ये ७५ वर्षांच्या स्त्री/पुरुषांचे अभीष्टचिंतन करण्यासाठी हिरीरीने काम करतात. सभेत इतरही कार्यक्रम ठरविणे, येणाऱ्या लोकांची व्यवस्था जातीने बघणे हेही करत असतात. सिद्धेश्वर मंदिराचा शिवरात्री उत्सव असला की ३ दिवस लघुरुद्र, भजन, शिवलीलामृताचे अखंड पारायण, ३ दिवस कीर्तन व शेवटी महाप्रसादाचे भोजन हे सर्व अंगावर घेऊन ते पार पाडतात. तरुणांना लाजवील असा उदंड उत्साह पाहिला की त्यांची या सर्व कार्याबद्दलची तळमळ लक्षात येते. त्यांची पत्नीही या सर्व कामात त्यांना निरलसपणे साथ देत असते.

कधीही ते रिकामे दिसणार नाहीत. नित्यपूजा, देऊळ, ब्राम्हण सभेचे काम हे सततच चालू असते. वाचनाचा नाद असल्याने २-३ पेपर वाचून झाल्यावरही झोपेपूर्वी कुठळे तरी पुस्तक हातात असतेच. बागकाम हा एक त्यांचा आवडता छंद आहे. निरनिराळी झाडे आणून त्यांनी गच्चीत सुरेख बाग बनविली आहे. त्यांचा मुलगा, सून हेही हौशी आहेत. वडिलांची खऱ्या फुलांची आवड पाहून 'फ्लॉवरपॉट्स'ची लायब्ररी सुरू केली आहे. आपापल्या छंदाप्रमाणे ते मुलांच्या आवडीला प्रोत्साहन देतात. मुलाला पेटीची तर सुनेला गाण्याची आवड आहे. त्यांनाही ते उत्तेजन देतात.

अशा या आमच्या नानांची त्यांच्या मुलामुलींनी, सुना-नातवंडानीही १० मे १९८८ रोजी ७५वा वाढदिवस म्हणून होमहवन करून गुळाची तुला केली. सर्व मंडळी एकत्र आली. रात्री शिवानी भक्तिगीत मंडळाचे भजन झाले. सर्व सोहळा आनंदात पार पडला. त्यावेळी मला सुचलेली रचना पुढे देत आहे.

(चाल : कानडा राजा पंढरीचा)

आज हा दिन हो भाग्याचा  
मम दीरांना लाभ जाहला अमृतोत्सवाचा ।।धृ।।

सर्वांशी ते असती प्रेमळ, वागणूकही तशीच सोज्वळ  
आल्या अतिथा देऊन ओंजळ  
घेती आशीर्वच त्यांचा ।।१।।

जन्मदिवस हा गणेशचतुर्थी, नावही त्यांचे तशाच अर्थी  
मायपित्यांची करुनी सेवा  
भूषविती ते स्वकुलाला ।।२।।

जनसेवेचे बांधुन कंकण, तनमन सारे 'सभेस' अर्पुन  
तरुणपिढीला मार्ग ही दाउन  
देती लाभ शिक्षणाचा ।।३।।

आयुरारोग्य असेच लाभो, सुखशांतीही तशीच नांदो  
वडिलजनांना करुनी वंदन  
विनती एकच ही प्रभुला ।।४।।

ooo



Marathe Pratishthan



माझ्या शब्दात मी

# कॉन्टॅक्ट लेन्स तज्ज्ञ कुंदा मराठे - गणात्रा

**जगांतली पहिली कॉंटॅक्ट लेन्स तयार झाली ती १९२८-२९ साली - जर्मनीत. भारतात कॉन्टॅक्ट लेन्सची पहिली जोडी तयार केली डॉ. शंकर हरि मराठे (पृ. १३२) यांनी १९४६ मध्ये. त्यांच्या क्लिनिकमध्ये लहानपणापासून लूडबूड करतां करतां या शास्त्रात त्यांची मुलगी कुंदा रोहित गणात्रा आतां कशी पारंगत झाली ते त्यांच्याच शब्दात.**

माझे वडील डॉ. शंकर हरि मराठे ह्यांनी भारतातली १ली कॉन्टॅक्ट लेन्सची पेअर १९४६ मध्ये तयार केली व पेशंटच्या डोळ्यांत बसविली. अशा प्रकारे Contact lenses (C.L.) भारतात वापरल्या जाऊ लागल्या. अर्थातच त्यावेळी C.L. चा वापर आतासारखा सर्रास नव्हता. दर दहा वर्षांनी त्यात सुधारणा करत असत. आता सर्व साधारण चष्मावालेही त्या सुरक्षितपणे, सफाईदारपणे वापरू शकतात.

नवीन मशिनरी विकत घेऊन अद्ययावत तंत्रज्ञान शिकण्यासाठी अप्पा London ला ६ महिन्यांसाठी गेले. त्या अवधीत अर्थातच Clinic चालवायला कुणीही नव्हते. Locum ठेवावा तर C.L. चे ज्ञान असणारा डॉक्टर सर्वतोपरी जबाबदारीने काम करण्यास मिळेना. "अप्पा, मी काही मदत करू शकते?" घाबरत मी विचारले. गिरगांवात १ल्या मजल्यावर Clinic आणि दुसऱ्या मजल्यावर घर असल्यामुळे मी रोज Clinic मधें लूडबूड करीतच असे. त्यामुळे S.S.C. होईपर्यंत C.L. बद्दल बरेच काही शिकून घेतले हे अप्पांच्या लक्षात आले व त्यांनी शास्त्रशुध्द धडेच मला द्यायला सुरवात केली. त्यामुळे मी ही जबाबदारी पेलीन अशी त्यांना खात्री होती. ते म्हणाले, "हो, पण तू यातील काहीही Degree परीक्षा पास झालेली नाहीस आणि मी सांगितलय म्हणून Clinic मधें बसतेस हे पेशंटला प्रांजळपणे सांगायचे."

आपण ही काही फार जबाबदारी घेतोय असं मलाही वाटलं नाही आणि तसं वडिलांनीही बाऊ करून घाबरवलं नाही. 'तुला नक्कीच सगळं जमेल' असा निर्वाळा देऊन स्वतः बिनघोर Londonला यंत्रसामुग्री आणण्यासाठी गेले. त्यांच्या या विश्वासाने माझाही Confidence दुणावला.

या काळांत कै. सौ. सुहासिनी मुळगांवकरांना लेन्सेस हव्या होत्या. सगळी हकीगत समजल्यावर ६ महिने डॉक्टरांची वाट बघायला त्या तयार नव्हत्या. त्या अप्पांना अनेक वर्षे ओळखत होत्या. त्या विश्वासाने म्हणाल्या, "अग, डॉ. नी सांगितलं आहे ना तुला, त्यांचे सर्टिफिकेट मला पुरेसे आहे. युनिव्हर्सिटीचे नसले तरी चालेल. तूच मला Lenses करून दे." पहिली Pair मी स्वतः तयार केली व सुहासताईंना बसविली. त्या अगदी शेवटपर्यंत Lenses लावीत होत्या. टेनिस, बॅडमिंटन सगळच Lenses लावून खेळायच्या. नंतर १२ वर्षांनी चाळीशीला आल्यावरही "मी चष्मा लावणार नाही हं कुंदा, काय करायचं ते तूच बघ." म्हणाल्या. तिथपर्यंत मीही परदेशचं C.L. आणि Optometry चं शिक्षण संपवून Practice सुरू करून २-३ वर्ष झालीच होती. मी Calculation करून Bifocal लेन्सेस चं काम होईल अशा Lenses बनविल्या व त्या शेवटपर्यंत सौ. सुहासताई वापरत होत्या. मी सौ. सुहासिनी मुळगांवकरांची याबाबतीत ऋणी आहे.

कारण हाच व्यवसाय करायचा, परदेशातून डिग्री घेऊन, हे जणू ठरूनच गेले होते. अप्पाही अतिशय उत्साहाने मला प्रोत्साहन देत. सगळीकडे, अगदी जगभर, मिळेल तिथे शिकण्याची Practical Experience ची संधी देऊन त्यांनी मला स्वतःच्या पायावर इभं रहायला आत्मविश्वास दिला. B.Sc. करता करता Optimetry चा Course कलकत्याला (फक्त तिथेच त्यावेळी हा Course होता.) करून मग London School of Optometry मधे शिकून मग London च्या जगप्रसिध्द हॉस्पिटलमधे Moorfields Eye Hospital (High Hoborn) येथे Dr. Ruben व डॉ. विल्सन यांच्या मार्गदर्शनाखाली शिकायचं भाग्य लाभलं. मोठा भाऊ डॉ. अरविंद Arizona University त Optics चा प्रोफेसर आहे. त्याच्याकडे मी गेले. तेथे Dr. Fineburg यांच्या हाताखाली ३ महिने शिक्षण घेतले. मायदेशी परत येता येता Chicago ला ३ महिने National Eye Research Foundation मधे छोटा Course केला. व जपानला १॥ आठवड्याचे Workshop व Lectures चा Course ही केला. (कधी नव्हे तो इंग्लिश माध्यमाचा Course त्यावेळी Japan मधे मिळाला)

हे सर्व होता होता १९७२ एप्रिल उजाडला. मे १९७२ साली स्वतःची Practice सुरू केली. ७१ मधें अप्पांना Heart Attack आला होता. त्यामुळे Clinic बंद होती. ७२ मधें येऊन चालू करायला जरा वेळच लागला. पुणे येथें तेव्हा Contact Lense चे काम कुणी फारसे करत नव्हते म्हणून पुण्यात Clinic काढायची कल्पना पुढे आली. अप्पांनी लगेचच १५ दिवसांनी १ शनि. रवि. ही Fonighty clinic ची कल्पना मांडली. ती अंमलात आणायची असे ठरले. तेथें Clinic सुरूही केले. C.L. ही कल्पना नवीन असल्यामुळे महिला मंडळातून कॉन्टॅक्ट लेन्स म्हणजे काय? हे सांगण्यासाठी लेक्चर्स देण्याचा

पृष्ठ १० वर चालू

## सासूबाईंनी गुजराथी शिकवले

डॉ. कुंदा गणात्रांच्या क्लिनिकमधे बसलो असतां त्यांना फोन आला. जसे त्या माझ्याशी भडाभडा मराठीमध्ये बोलत होत्या तसेंच भडाभडा त्या फोनवर गुजराथी बोलत होत्या. मी त्यांना विचारले, "तुम्ही गुजराथी कधी शिकला?" त्यावर त्या म्हणाल्या, "मला लग्नाआधी थोडेथोडे गुजराथी वाचता येत होते. कारण मी मोडी लिपी शिकले होते. बोलता मात्र येत नव्हते. लग्नानंतर सासरीही प्रथम हिंदीत बोलायची. पण सासूबाई म्हणाल्या मी तुला गुजराथी शिकवीन. बोल तू बिनधास्त. चुकणार म्हणून घाबरू नकोस. त्या माझ्या चुका सुधारू लागल्या आणि वर्षभरात मी जणूकाही गुजराथी मातृभाषा असावी अशा सफाईदारपणे बोलू लागले." - संपादक.

Marathe Pratishthan

# उद्योग त्रिमूर्ती - प्रकाश, सुहास व सतीश मराठे

**- प्रकाश श्रीधर** (पृ.१९), दादर, मुंबई

**घरांतले एक माणूस शिकले की सारे घर शिकते असे म्हणतात. देवगड तालुक्यातल्या पुरळ गांवच्या श्रीधर पंतांचा थोरला मुलगा व्यवसायात शिरला - यशस्वी झाला आणि पाठचे दोन भाऊही आपापल्या नोकऱ्या सोडून स्वतंत्र व्यवसाय करू लागले. त्यांचे पाहून त्यांच्या सहधर्मचारिणीहि पुढे सरसावल्या. तीनही कुटुंबे, नव्हे तीन्ही भावांचे 'एकच' कुटुंब, अगदी 'व्यवसायमय' झाले. बिगर मराठी व्यापारी - उद्योजक घराण्यांत प्रचलित असणारी Business House ची कल्पना आता मराठे कुळातही मूळ धरू लागली आहे ही गोष्ट निश्चितच शुभसूचक मानावी लागेल. - संपादक**

श्री स्वामी समर्थ चरणी विनम्र होऊन आज ही माहिती देताना मनावर फार मोठे दडपण आले आहे. परंतु श्री. लक्ष्मण शंकर यानी लिहिण्यासाठी सतत पिच्छा पुरविल्याने हे लिहिण्यावाचून आता गत्यंतर नाही याची जाणीव झाली. स्वतःविषयी माहिती लिहिणे ही आत्मप्रौढी अथवा आत्मस्तुती आहे ही भावना सतत माझ्या मनात घर करून राहिल्याने ती लिहिण्यास टाळाटाळ करत होतो परंतु अखेर अशा उपक्रमामधील कुटुंबांची माहिती अन्य कुलबाधवांना प्रेरणादायी ठरेल हें श्री. लक्ष्मण शंकर यांचे म्हणणे सर्वार्थाने पटल्याने मी हा अल्प परिचय देत आहे.

आम्ही मूळ देवगड तालुक्यातील पुरळ गांवचे. कोकणातील कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची येथे वेगळी माहिती देण्याची गरज नाही. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आमच्या वडिलाना त्यांचे चुलत बंधू श्री. परशुराम मराठेयानी कल्याणला त्यांच्या घरी आणले व शिक्षणाची व्यवस्था केली. साधारणतः १० वी पर्यंत शिक्षण झाल्यावर अपरिहार्य कारणामुळे शिक्षण सोडून नोकरीचा तपास करणे जरूरीचे होते. शेवटी नोकरी निवडतानासुध्दा रहाण्याची व जेवणाची सोय होईल अशा प्रकारची असणे जरूरीचे होते. त्यासाठी हॉटेलशिवाय अन्य मार्ग नाही. म्हणून दादरात आदर्श दुग्धमंदिर या दुकानात नोकरी धरली. ती अखेरपर्यंत. त्याकाळी फूटपाथवर झोपूनही त्यांनी दिवस काढले. लग्न झाल्यावर आमची सौ. आईही कोकणातच राहिली. १९४८ ला सौ. आईला मुंबईत दादरात आणून बिऱ्हाड चालू झाले. एकत्र कुटुंबाची संकल्पना असल्याने चुलतेही सोबत होते. पुढे जागेच्या अडचणीमुळे दोघानी जोगेश्वरीस जागा घेतल्या. दोघे कोकणात स्थायिक झाले. त्यानंतर परत सौ. आईस आमची आजी आजारी असल्याने कोकणात रहावे लागले. ते १९६६ पर्यंत. त्यानंतर आम्ही मुंबईस कायमचे वास्तव्य केले.

आम्ही एकूण चार भावंडे. आम्ही तिघे भाऊ व एक बहीण. अनु. १) काशिनाथ श्रीधर उर्फ प्रकाश २) सुहास श्रीधर ३) सतीश श्रीधर व बहीण सौ. रेखा (आता सौ. मानसी बापट).

मी १९७२ साली एस. एस. सी. झालो. त्यानंतर कॉलेजात जाण्यासाठी वडिलांनी सुचविले. परंतु ते एकटे कमविणारे व खाणारी तोंडे जास्त या विचाराने आधी नोकरी पहावयाची असे ठरविले व

---

# यशाचे रहस्य

***प्रत्येक यशस्वी माणसाला एक प्रश्न हमखास विचारला जातो तो म्हणजे 'तुमच्या यशाचे रहस्य काय?' मी प्रकाश मराठ्यांना असला गुळगुळीत झालेला प्रश्न नाही विचारला. मी त्यांचेशी दोन-तीन वेळा तास-तास मुक्त गप्पा मारल्या. त्यांतून मला जाणवलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्याच शब्दांत - संपादक***

"आपल्यापेक्षा पुढे असणाऱ्या माणसाकडे नेहमी पहावे. तेवढी उंची काही प्रत्येकाला नाही गाठता येणार. पण स्वतःपेक्षा १०-१५-२० टक्के तरी वरती जाल! खालच्याकडे पाहिले तर तुमची प्रगतीच खुंटली!!"

"माणसाची आपल्या कामावर निष्ठा असायला पाहिजे. Service Industry मध्ये तर दिलेली वेळ पाळणे महत्त्वाचे. भले एखादा दिवस उशीराची तारीख दिली तरी चालेल पण दिलेली तारीख चुकता कामा नये."

"धंद्यात माणसे जोडणे महत्त्वाचे. तोडायला एक क्षण पुरतो, पण जोडायला कित्येक महिनेच नव्हे तर वर्षे लागतात."

"सतीश आणि सुहासच्या बायकांना लग्नापूर्वी स्पष्ट कल्पना दिली की आम्ही व्यावसायिक माणसे. आम्हाला ऑफिस टाईम नाही. साप्ताहिक सुट्टी नाही. त्यामुळे रविवारी चौपाटीवर फिरायला जाणे नाटक-सिनेमाला जाणे अशा अपेक्षा पुऱ्या करणे आम्हाला कदाचित नाही जमणार. त्यांनीही ते मानले. खुल्या दिलाने स्वीकारले. आणि म्हणून आमच्या दादरच्या घराचे 'घर' पण टिकून राहिले."

"आमची स्वामी समर्थांवर नितांत श्रध्दा आहे. लग्नानंतर सतीश सौ. आकांक्षेला घेऊन स्वामींच्या मठात गेल्यावर त्याने तिला पहिली गोष्ट सांगितली ती म्हणजे आबा (म्हणजे प्रकाश) व वहिनीला उलट उत्तर द्यायचे नाही अशी शपथ आपण स्वामींच्या पायाशी आज घेऊया."

"सौ. अश्विनीच्या मनात स्वतःही सुहास बरोबर मार्केटिंगमधे लक्ष घालण्याची उमेद निर्माण झाली. मी तिला सांगितले जुने कोकण प्रॉडक्टस् आहेतच. तू तुझे काही नवे प्रॉडक्टस् चालू कर. चकली, लाडू, पुरणपोळ्या असे घरगुती खाद्यपदार्थ ऑफिसात नेऊन विकायला सुरवात कर असे मी तिला सुचविले. तिच्या नातलगांच्या मदतीने उत्पादनाची तर जुळवाजुळव झाली. पण विक्रीबाबत ती साशंक होती. मी तिला धीर दिला - "विक्रिची काळजीच करू नकोस. आजकाल घरी कोणाला काही करायला नको असते. रेडीमेडचा जमाना आहे सध्या." पहिल्या दिवशी दोन पिशव्यात माल घेऊन ती घरा जवळच्याच एका कार्यलयात गेली. दोन-अडीच तासांत सुमारे पाच-सहाशेचा माल खपवून 'जितं मया' अशा विजयी मुद्रेने घरी आली."

ooo

Marathe Pratishthan



डावीकडून अनुक्रमे प्रकाश, सुहास, सतीश (पुढ्यात साक्षात), आकांक्षा, अश्विनी, जयश्री (कडेवर योगिनी)

अर्ज करण्यास सुरवात केली. मुळात मला मेकॅनिकल लाईन ची आवड. परंतु कोठे योग्य काम मिळेपर्यंत बसून काय करणार म्हणून आमचे मावस बंधु श्री. केशव सिताराम मराठे हे ज्या धी गिरगांव पंचे डेपो प्रा. लि. यांच्या गिरगाव दुकानात जात तेथे क्लार्क म्हणून मी रुजू झालो. ही संस्था कुलकर्णी बंधूंची. त्यांची आणखीही इंजिनिअरिंग युनिट होती. सुरवातीस आम्ही मासिक दिनदर्शिका पोस्टकार्डावर छापून त्याचे वाटप आमच्या मान्यवर गिऱ्हाइकास करावयाचे. साधारणतः चार हजार कार्डे पत्ते लिहून रवाना करावी लागत. पगार महिना रु. १२०/-. या कामाच्या संदर्भात सर्वात ज्येष्ठ असलेले श्री. अरविंद तथा भाई कुलकर्णी यांचेशी संबंध आला. स्वभावाने अतिशय कडक असल्याने त्यांचे समोर बोलणे सोडाच उभे रहावयासही कोणी तयार नसे. त्यांना मी प्रत्यक्ष भेटलो व सांगितले की मला अकाऊंटस् शिकावयाचे आहे. त्यानाही जरा आश्चर्यच वाटले कारण त्याप्रकारची माझी शैक्षणिक बाजू नव्हती. ते म्हणाले मी शिकवीन. परंतु ऑफिसची वेळ संपल्यावर माझ्या शिक्षणास सुरवात झाली. योगायोगाने इंजिनिअरिंगचे हिशेब जे गृहस्थ पहात होते ते असि. अकाऊंटंट सरकारी नोकरी मिळाल्याने सोडून गेले. त्यामुळे त्यांच्या जागेवर काम करण्याची जबाबदारी माझ्यावर आली. कित्येक गोष्टी पूर्वी कशा केल्या हे पाहून मी शिकत होतो. हे चालू असतानाच युनायटेड वेस्टर्न बँक व महिंद्राचे कॉल आले. परंतु श्री. अरविंद कुलकर्णी व आमचे वडील यांच्या निर्णयानुसार मी येथेच राहिलो. कोणत्याही लहान परंतु वाढत असलेल्या संस्थेमध्ये सर्व प्रकारची कामे करण्याचा अनुभव चांगला येतो. येथे मी कधी घड्याळ व सुट्टी पाहिली नाही. हे काम माझे स्वतःचेच आहे असे समजूनच करत राहिलो. त्यामुळे कुलकर्णी कुटुंबीय व मी अधिक जवळ आलो. त्याची परिणती १९८४ साली झाली. गिरगाव पंचे डेपो, गिरगाव या दुकानाची भागीदारी करताना माझा अंतर्भाव श्री. आई व श्री. आप्पा कुलकर्णी यांनी केला. ही माझ्या दृष्टीने अधिक जबाबदारी होती.

१९९३ साली श्री. विजय फळणीकर या सद्गृहस्थांचा दुसऱ्या व्यवसायाच्या संदर्भात परिचय झाला व त्याची परिणती दृढ स्नेहात झाली. श्री. विजयराव यांनी अलिस कंपनीतील एरिआ मॅनेजर या हुद्याचा त्याग करून रत्नागिरीतील त्यांच्या वडिलोपार्जित प्रॉपर्टीची देखभाल करण्यास सुरवात केली होती. आज त्यांनीही त्या क्षेत्रात फार मोठी प्रगती केली आहे. त्यांच्यामुळे डॉ. काणेंशी परिचय होऊन त्यांच्या कॅटॉनिक बायोटॉनिक या झाडांसाठी आयुर्वेदिक गोळ्या विकावयास सुरवात केली. कारण भारत हा शेतीप्रधान देश असून ८०% लोक शेतीवर अवलंबून असतात. परंतु या प्रॉडक्टमधील इनग्रेडीयंटस् अद्यापही आम्हाला माहीत नाहीत. तरी पण ज्यानी ते वापरले त्याना रिझल्ट उत्तम आल्याने त्याची विक्री वाढत गेली.

१९९६ दसऱ्याला डॉ. सुधीर घाटणेकर यांच्या सुयश बायोजेनिक्स प्रा. लि. ही कंपनी उत्पादित करत असलेल्या जैविक खतांच्या विक्रीस मे. योगसंजिवनी एन्टरप्राईज या कंपनीखाली सुरुवात केली. डॉ. घाटणेकर यांना डॉ. काणेंच्या प्रॉडक्सची आम्ही चांगल्या प्रकारे विक्री केल्याचे समजल्यावर त्यानी आपले प्रॉडक्ट विकण्यासाठी आम्हास उद्युक्त केले. आज जागतिक स्तरावर रासायनिक खतांचे व फवारणी औषधांचे दुष्परिणाम दिसावयास लागले आहेत. त्यामुळे जैविक खतांचे महत्त्व या पुढील काळात वाढतच जाणार आहे. त्यामुळे या मालाची मागणीही आता वाढत आहे.

सुहास श्रीधर हा माझा दोन नंबरचा भाऊ एस. एस. सी झाल्यावर गिरगांव पंचे डेपो मध्ये सेल्समन म्हणून रुजू झाला. त्याचबरोबर बँका, पत्रव्यवहार पाहू लागला. १२ वी कॉमर्स झाल्यावर १९९२ साली पंचे डेपो मधून निवृत्त होऊन मे. त्रिमूर्ती ट्रेडींग कॉर्पोरेशन या नावाने फूड प्रॉडक्टस् वितरणास सुरूवात केली. यामागचा मूळ उद्देश म्हणजे हापूस आमरस, सरबत, सर्व प्रकारचे जॅमस्, कुळीथ पीठ, आमचूर पावडर इ. कोकणात उत्पादित होणाऱ्या वस्तू मुंबईत वितरित करावयाच्या. हळूहळू प्रत्येक दुकानातून माल जावयास लागला. डिलिव्हरीसाठी थ्री व्हिलर घेतली गेली. हे सर्व करतानाच त्याने एल. आय. सी., जी. आय. सी, पोस्ट ऑफीस, यू टी आय यांच्याही कामास सुरवात केली व त्यातही त्याची चांगली प्रगती होत आहे.

सतीश हा माझा तीन नंबरचा भाऊ १२वी सायन्स शारदाश्रम मधून झाल्यावर इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन साठी सांगलीत वसंतदादा पाटील इंजिनिअरिंग कॉलेजला ॲडमिशन घेतली. ते १९८४ साल होते. २९ जुलै १९८४ ला आमच्या मातोश्रीस स्वर्गवास झाला. तिच्या १३ व्या

## प्रतिष्ठानने उद्योग प्रवर्तन निधी उभारावा

एखाद्या 'शेट्टीला' हॉटेल चालू करायचे असेल तर त्याचे व्यवसाय बंधू पैशासह सर्व मदत करून ४-५ वर्षांत त्याला व्यवसायांत प्रस्थापित करतात.

मराठे प्रतिष्ठानने अशा प्रकारचा दृष्टिकोन स्वीकारून उद्योग प्रवर्तन उपक्रमाचाच एक भाग म्हणून **'उद्योग प्रवर्तन निधी' निर्माण करावा** व त्यांतून नवीन व्यावसायिकांना आर्थिक मदत करावी अशी सूचना श्री. प्रकाश श्रीधर यांनी केली. म.प्र. च्या ८०० सभासदांपैकी निदान २०० सभासदांनी दरमहा अवघे १०० रुपये दिले तरी महिन्याचे २० हजार म्हणजे वर्षात सुमारे अडीच लाख रुपये जमू शकतील असा हिशेबही त्यांनी मांडून दाखविला.

मराठे कुलबांधव हे आव्हान नाही का स्वीकारणार? - **संपादक**

Marathe Pratishthan

दिवशीस त्याला गाडीला बसविले, तोपर्यंत मी डोळ्यातून पाणी येऊ दिले नाही. त्यालाही फार जड गेले. १९८७ ला तो फर्स्ट क्लासमध्ये पास झाला व आमच्याच एका इंजिनिअरिंग युनिटमध्ये प्रॉडक्शन पाहू लागला. ६-७ महिन्यानंतर त्याला मे. निओ फार्ममध्ये कस्टमर सपोर्ट सर्व्हिस इंजिनिअर म्हणून जॉबची ऑफर आली. या कंपनीकडे मेटलर या स्विस कंपनीची वेइंग मशिनची एजन्सी होती. कॅरेट आणि ग्रॅम बॅलन्स असल्यामुळे डायमंड व गोल्ड मार्केटशी संबंध आले. १९९२ ला निओ फार्मा कंपनी बंद झाली. त्यामुळे प्रश्न उभा राहिला. शेवटी मोठा धाडसी निर्णय घेतला. त्याचाच एक मित्र श्री. नंदेश लोखंडे व आम्ही मिळून १९९२ सप्टेंबरला 'मेट्रॉनिक्स' या नावाने पार्टनरशिप फर्म सुरू करून स्वतंत्र मेंटेनंस कॉन्ट्रॅक्ट घ्यावयास सुरवात केली. आज ११०० च्या वर आमच्याकडे ॲन्युअल कॉन्ट्रॅक्टस् आहेत. त्यामध्ये मुंबईतील प्रख्यात सर्वच ज्युवेलर्स आहेत.

यामध्ये जून १९९० ला परत एक धक्कादायक घटना घडली. आमच्या वडिलांना स्वर्गवास झाला. आमची दोनही छत्रे हरपली. माझ्यावर फार मोठी जबाबदारी आली. परंतु आपली कुलस्वामिनी व श्री. स्वामी समर्थांच्या कृपेने ती मी पार पाडत आहे.

२३ मे १९७९ ला माझा विवाह झाला. आई सतत आजारी असल्याने घरात पहाण्यास कोणी नसल्याने हा निर्णय घेणे भाग पडले. सौ. जयश्री कोकणातीलच आहे. तिने आमचे घर व्यवस्थित सांभाळल्याने हा प्रवास आम्ही करू शकलो.

१७ डिसेंबर १९९५ ला सतीशचा विवाह झाला. त्याची पत्नी सौ. आकांक्षा ही बी. एस. सी. व इंडस्ट्रीअल ॲनॅलिटिकल केमिस्ट्रीचा डिप्लोमा घेऊन फर्स्ट क्लास मध्ये पास झाली. तिने २ वर्षे एका रंग बनविणाऱ्या कंपनीत नोकरी केली. आतां तिही सतीशच्याच व्यवसायांत लक्ष घालीत आहे.

३१ जानेवारी १९९६ ला सुहासचा विवाह झाला. सौ. अश्विनी बी. ए. असून तिनेही सुहास सोबत मार्केटिंगमध्ये लक्ष घालून तो व्यवसाय वाढविण्यास सुरवात केली आहे.

या सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच कोकणात पुरळ मुक्कामी आमच्या वडिलांनी घेतलेल्या जमिनीत त्यांनी स्वतः मेहनत घेऊन ३०० हापूसची कलमे लावली आहेत. त्याची व्यवस्था करून आणखी त्यात भर घालत आहोत. सामाइक प्रॉपर्टीत हक्क मागायचा नाही हा वडीलांनी दिलेला सल्ला आहे.

या सर्व प्रगतीत आमच्या कुटुंबातील प्रत्येकाचा सहभाग मोठा आहे. सर्वांनी एकमताने चालण्याचे ठरविल्याने मतभेद झाले तरी ते लगेच सुटतात. शेवटी आपणास व्यवसायाशिवाय पर्याय नाही हे सूत्र मी पहिल्यापासून उराशी बाळगून होतो. यात आमच्या अर्धांगिनीचा सहभागही तेवढाच महत्त्वाचा आहे. कारण व्यावसायातील व्यक्तींना इतर छंद फार जोपासता येत नाहीत.

या सर्व प्रवासात कुलकर्णी कुटुंबियांची बहुमोल साथ आम्हाला लाभली. श्री. व सौ. भाई कुलकर्णी यांनी आई-वडिलांचे प्रेम आम्हाला दिले. भाई महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या अग्रणी संस्थेचे उपाध्यक्ष व २ वर्षे अध्यक्ष होते.

आई वडिलांचे आशीर्वाद व त्यांची शिकवण सतत स्मरणात आहे. आमची आई जाता जाता काही वाक्य बोलून जायची. त्याचा प्रत्यय आजही पावलो पावली आम्हाला येतो. उदा. दसपट कराल तेव्हा किसपटाची अपेक्षा ठेवा. ज्याच्या पायात चप्पल नाही त्याचेकडे पहा म्हणजे तुम्ही किती सुखी आहात ते तुम्हाला समजेल. कोणाचेही कांही करताना अपेक्षा ठेवून करू नका म्हणजे यातना होणार नाहीत इ.

अजून आम्हाला पुढे जायचे आहे. श्री समर्थांवर आमच्या कुटुंबियांची नितांत श्रध्दा आहे. आपल्या सारख्या सुहृदांचे आशीर्वादही आम्हाला प्रेरणादायी ठरतील. याबद्दल कोणताही संदेह नाही.

ooo

---

**कुंदा गणात्रा** (पान ७ वरून)

सपाटाही सुरू केला. पण पुण्यांत सुरवातीला सहा महिने म्हणावा तसा response वाटेना. "अप्पा मी नाही जात पुण्याला. उगाचच खर्च होतो आणि मिळवत तर मी काही सुध्दा नाही." मनांतली खंत मी अप्पांकडे व्यक्त केली. "तूच कमावून आणलेस तरच आपण खाऊ अशी परिस्थिती नाही ना? मग कशाला काळजी करतेस? २ वर्षे सातत्याने जा. मग काही नाही जमले तर विचार करू" असा सल्ला त्यांनी दिला. आतां २५ वर्षांनंतर एवढा पसारा झालाय कीं, पुणे Practise सोडावीशी वाटत नाही. एका assistant ला तयार करून, पुणे येथे दिवसभर माझ्या अनुपस्थितीतही त्या Clinic चालवितात. व १ल्या व ३ऱ्या शनि. रवि. नवीन पेशंटच्या Appointments, जुने पेशंट Checking वगैरे Arrangements करून ठेवतात.

मध्यंतरी ७२ ते ७६ चार वर्षे इंदूर आय हॉस्पिटललाही Attachment मिळाली. तेथेही खूप पेशंटस् असायचे. तसा विचार केला तर मध्य प्रदेशात Contact Lenses Introduce करायचे श्रेय मलाच आहे. तेथेही भरपूर Practical experience मिळाला. Indore ला मग महिन्यातले उरलेले दुसरा व चौथा शनिवार, रविवार, C.L. clinic Hospital मधे सुरू झाले.

काम आवडत असल्यामुळे व प्रवासाचीही तितकीच आवड असल्यानें कंटाळा हा शब्द कधी काढावासाच वाटला नाही.

१९७७ मधें श्री. रोहीत गणात्रा यांच्याशी विवाह झाला. ते Architect, Valuer आणि Interior Designer आहेत. सासरहूनही भरपूर प्रोत्साहन होतंच व्यवसाय करण्यासाठी. मुख्य म्हणजे १९८४ मधें देवांगीचा जन्म झाल्यावरही सासर-माहेरचं प्रोत्साहन मिळून अजूनही व्यवसाय अव्याहतपणे चालू ठेवू शकले.

गुजराथी माणसाशी लग्न केल्यामुळे अप्पा व आईचा भरपूर विरोध होता. पण प्रथम लग्नाला विरोध करणारे आईवडील नेहमीच काही दिवसांनी खऱ्या ओढीमुळे लेकीला बोलवायला लागतात. तसेच झाले. लेकीच्या मनात किंवा सासरच्या मंडळींच्या मनांतही किल्मिष नव्हतेच. परत जा ये सुरू झाली. १९८३ मधें अप्पांच्या निधनानंतर तर आई लेकीकडेच होती. तिथेच तिचे गौरी विसर्जनाच्या दिवशी १९९६ मधे निधन झाले.

आता मागे वळून पाहतानां एवढी २६ वर्षे Profession मध्ये झाली आहेत हे खरही वाटत नाही. पण हे सगळयांच्या आशीर्वादाने, पाठिंब्यामुळे व देवाच्या कृपेमुळेच झालं असं प्रामाणिकपणे म्हणावसं वाटतं.

ooo



Marathe Pratishthan

# नैसर्गिक खतांसाठी जैविक तंत्रज्ञान

## (उद्योग प्रेरणा - गटचर्चा) दि. २५.७.१९९८

**वृतांत - विनायक केशव (पृ.२०)** कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

मराठे प्रतिष्ठानतर्फे ब्राह्मण जातीबांधवांमधेय उद्योगाविषयी औत्सुक्य निर्माण व्हावे व विशेषतः तरुण वर्गांनी नोकरीच्या मृगजळामागे न धांवता उद्योगप्रवण व्हावे या हेतूने उद्योग-प्रेरणा हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत अंधेरी, मुलुंड व मुंबई येथे उद्योग मेळावे आयोजित करण्यात आले होते. या मेळाव्यांचा अनुभव व विचारविनिमय ध्यानात घेता असे दिसून आलं की जरी हे मेळावे उत्साहवर्धक असले तरी प्रत्यक्ष उद्योग सुरू करण्याकरिता वा मार्गदर्शन मिळविण्याकरिता मार्गदर्शक व मार्गदर्शन घेऊ इच्छिणारे इच्छुक यांचा वैयक्तिक पातळीवर संपर्क येणे आवश्यक आहे.

सबब दि. २५ जुलै १९९८ रोजी मराठे उद्योग भवन येथे एक गट चर्चा (ग्रूप डिस्कशन) आयोजित करण्यात आली. या चर्चासत्रात व्यक्तिगत पातळीवर विचारांची देवाण घेवाण व्हावी, मार्गदर्शन व्हावे म्हणून पर्यावरण तज्ञ व नैसर्गिक शेती/बागायती चे पुरस्कर्ते डॉ. सुधीर घाटणेकर याना मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. डॉ घाटणेकरांशिवाय सर्वजण मिळून १८ व्यक्तींना आमंत्रण दिले होते. यामध्ये कार्यकारी मंडळाचे सदस्य सुध्दा समाविष्ट होते.

> **सुंदर व हुषार मुलींना कॅन्सर होतो!(?)**
>
> सुहासिनी मुळगांवकर व कुंदा गणात्रांची बहीण पद्मजा बर्वे दोघींची अगदी जीवश्च कंठश्च मैत्री. दोघीही मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए. मधे सुवर्ण पदक धारक. सुहासिनी बाईंना संस्कृतचे तर पद्मजा बर्वेंना मराठीचे सुवर्णपदक मिळाले होते.
>
> पद्मजा बर्वेंना कॅन्सर झाला. त्यातच त्या गेल्या. सुहासिनी बाईंच्या मनाला तें फार लागले. एकदा अचानक त्या कुंदा गणात्रांना म्हणाल्या, ''पद्मजा कॅन्सरने गेली, कुंदा, मला पण कॅन्सर होणार. कारण सर्वच हुषार व सुंदर मुलींना कॅन्सर होतो.'' आहे ना अजब तर्कशास्त्र?
>
> पण दुर्दैवाने हा तर्क खरा ठरला. सुहासिनीबाईंचाही अंत कॅन्सरनेच झाला!

चर्चासत्राच्या सुरवातीला अध्यक्ष श्री. सुरेशभाऊ मराठे यांनी या कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला. त्यानंतर ही चर्चा कोणत्या स्वरूपात व्हावी यासंबंधी रूपरेषा स्पष्ट केली.

डॉ. घाटणेकर यांना प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे खूपच कौतुक वाटले. त्यांनी प्रथमतः या अत्यंत योग्य वेळी केलेल्या उपाययोजनेबद्दल प्रतिष्ठानचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यानंतर परस्पर ओळखीचा कार्यक्रम झाला. डॉ. घाटणेकर यांनी खालील विचार आपल्या प्रास्ताविक भाषणात व्यक्त केले.

'सध्या सर्व जगभर प्रदूषणाचा प्रश्न फार मोठ्या प्रमाणावर चर्चिला जात आहे. प्रदूषणाचा राक्षसी विळखा प्रायः प्रत्येक क्षेत्राला पडला आहे. मनुष्य, प्राणी, निसर्ग यांचा बचाव जर वेळेवर केला नाही तर भयंकर परिस्थिती निर्माण होईल. या ऱ्हासापासून वाचण्यासाठी जैविक तंत्रज्ञान (Biological Technology) आपणाला विकसित करावे लागेल. सुदैवाने या तंत्रज्ञानाचा वापर आपणाला सर्व क्षेत्रात करता येतो. या तंत्रज्ञानाने प्रदूषण होण्याचा धोका तर टळतोच शिवाय चांगल्या प्रतीचे निकाल आपणाला प्राप्त होतात.

अळंबीचा गोष्ट घ्या. अळंबी हा उत्कृष्ट तऱ्हेचा खाद्यपदार्थ आहे. आता त्याला लोकमान्यता करणे अत्यंत किफायतशीर आहे. अत्यंत अल्प भांडवलाच्या जोरावर अल्प मनुष्यबळ वापरून हा व्यवसाय करता येतो. शिवाय प्रदूषण टाळून यंत्रसामुग्री टाळून आपण प्रदूषणविरोधी मोहिमेत नकळत सामील होतो.

इन्झाइमस् ही तर मानवाला मिळालेली अपूर्व देणगी आहे. यांचा उपयोग कापड, कातडीस तेल आदि अनेक क्षेत्रात होतो. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण याचा दोन हजार कोटींचा खप अपेक्षित आहे. मेहनत कराल तेवढे कमवाल व जगाला मानवजातील प्रदूषणापासून वाचविण्याचे पुण्य संपादन कराल. फक्त इच्छाशक्ती पाहिजे. नोकरीचा मोह सोडण्याचे धाडस पाहिजे.

जैविक तंत्रज्ञानाचा प्रभाव अमर्यादित आहे. उपयोगी पडेल अशा स्वरुपात उपलब्ध करून देणारे जमिनीतील पोटॅशिअम वनस्पतींना जिवाणू शोधून काढण्यात आपल्या शास्त्रज्ञांना यश प्राप्त झाले आहे. आता पोटॅशिअमची आयात थांबविता येईल. नैसर्गिक खते व नैसर्गिक कीटकनाशके मोठ्या प्रमाणावर तयार करता येणे शक्य आहे. सरकारी मदत व सवलती भरपूर आहेत. तरुणांना या क्षेत्रात खूपच वाव आहे. या तंत्रज्ञानाचा औषधनिर्मितीच्या क्षेत्रात वापर होऊ लागला आहे व तो अत्यंत यशस्वी ठरला आहे. अर्थात् हे क्षेत्र औषधांचे असल्यामुळे सरकारतर्फे ना हरकत प्रमाणपत्र मिळवावे लागते. ही गोष्ट कठीण असली तरी कष्टसाध्य आहे.

या व्यवसायाला काही कोट्यावधी रुपयांचे भांडवल लागते, मोठी यंत्रसामुग्री लागते असेही नाही.लहान प्रमाणावर केवळ पाच लाख भांडवलातसुध्दा हा व्यवसाय सुरू करता येतो. अगदी खेडेगावीसुध्दा करता येतो. मध्यम स्वरूपाच्या उद्योगाला सुमारे ३० लाख रुपये भांडवल, एक एकर जमीन, पांच हार्स पॉवर शक्तीचे इंजिन व पंधरा माणसे यांच्या जोरावर कोट्यावधी रुपयांची उलाढाल करता येते. ही खते उत्पादन केल्यापासून पांच वर्षपर्यंत वापरता येतात.

आपल्यापैकी कोणीही वा इतर कोणत्याही व्यक्तीनी इच्छा प्रगट केली तर मी संपूर्णपणे मदत करीन''

डॉ. घाटणेकरांच्या या प्रास्ताविकाला खूपच चांगला प्रतिसाद मिळाला. उपस्थित बांधवांनी अनेक प्रश्न विचारले. अनेक खुलासे प्राप्त करून घेतले. तीन बांधवांनी तर या विचारांपासून स्फूर्ती घेऊन नवीन व्यवसायाची आंखणी करण्याचा मनोदय प्रगट केला.

उत्पादन करता येईल पण बाजारपेठेचा प्रश्न कसा सोडवणार? डॉ. घाटणेकरांनी या समस्येवर व्यक्तिगत स्तरावर विचार करण्याची जरूरी आहे असे सांगितले कारण मार्केटिंगचे स्वरूप



Marathe Pratishthan

निरनिराळ्या उत्पादनाचे बाबतीत निरनिराळे असते.

ही गटचर्चा अत्यंत यशस्वी, व प्रेरणादायक झाली. चर्चा संपेपर्यंत वातावरण उत्साही होते. आपण नवीन उद्योग करू शकू, ते आपल्या आवाक्याबाहेर नाहा, फक्त वैयक्तिक मार्गदर्शन व प्रोत्साहन यांची आवश्यकता आहे, हीच भावना जवळ जवळ प्रत्येक उपस्थिताच्या ठिकाणी आढळून आली.

चर्चेचा समारोप करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊंनी घाटणेकरांचे व सर्व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. ते म्हणाले, ''मराठे प्रतिष्ठानच्या तर्फे उद्योग प्रेरणा हा उपक्रम आम्ही नुकताच सुरू केला आहे. त्यातील गटचर्चा हा आजचा पहिला प्रयत्न यशस्वी झाला आहे.

तरुणांनी व व्यवसायिकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा व विचार तसेच तज्ञानी केलेले मार्गदर्शन व खुलासे मी लक्षपूर्वक ऐकत होतो. कारण मी स्वतः उद्योजक आहे. सहाजिकच उद्योगविषयक चर्चेमध्ये मला इंटरेस्ट आहे. मराठी आणि त्यातून ब्राह्मण व्यक्तींनी एकत्र येऊन उद्योग व्यवसायावर विचार मांडावेत हा अपूर्व योग म्हणावा लागेल.

अर्थात् ही नुसती सुरवात आहे. या विचारमंथनाचा फायदा घेऊन उपस्थित बांधव नवीन व्यवसायाचा शुभारंभ करतील वा आपल्या सांप्रत व्यवसायांत फलदायी सुधारणा करतील, आणि 'मराठी माणूस आरंभशूर' ही म्हण खोटी ठरवतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

या पुढील अशा तऱ्हेचे विचारमंथन अधिक अर्थपूर्ण व वास्तव (Practical) असेल कारण प्रत्यक्ष व्यवसायात शिरल्यानंतर अडचणी उद्भवतात. आपण कल्पनाही केली नसेल अशा अडचणी अचानक गनिमी काव्याने आपला मार्ग अडवितात. हा माझा एकट्याचा अनुभव नसून प्रत्येक उद्योजकाचा अनुभव आहे.

अशा तऱ्हेच्या उद्भवलेल्या अडचणी आणि आपण स्वतःचं तंत्र निर्माण करून व त्याचा वापर करून या अडचणींवर कशी मात केली हे अनुभव कथन पुढील चर्चासत्रांचे वैशिष्ट्य राहील. पण त्याचबरोबर नवीन उद्योगांची ओळखही त्यामध्ये असावी अशी माझी अपेक्षा आहे.'' ०००

---

# कुलवृत्तांत कशासाठी ?

**- वरुणराज चिंतामणी भिडे**, सहसंपादक-सकाळ, पुणे (गोडबोले कुलवृत्तांतामधून साभार)

**'कुलवृत्तांत' हे एक फॅड आहे, रिकामपणाचा उद्योग आहे, अशी अनेक जाणकारांचीहि ठाम समजूत आहे. या दृष्टीने कुलवृत्तांताचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनांतून काय महत्त्व आहे ते विशद करणारा हा लेख.**

कुलवृत्तांत ही कल्पना आता समाजात चांगल्या रीतीने रुजली आहे. आपटे कुलवृत्तांत हा अशा प्रकारचा पहिला उपक्रम. तेव्हांपासून आजपर्यंत कुलवृत्तांत व्हावेत की नाही, हाच वादाचा आणि मतभेदाचा विषय ठरला आहे. 'कुलवृत्तांत म्हणजे आपले आपल्याभोवती दिवे ओवाळून घेण्याचा प्रकार आहे.' 'जातीयतेची भावना वाढविणारा हा प्रकार आहे.' 'अशा कामात आम्हाला रस नाही'. या प्रकारचे आक्षेप पहिल्या कुलवृत्तांताच्या वेळेपासून घेतले गेले होते, आज घेतले जात आहेत आणि भावी काळातही घेतले जातील. तथापि आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या कुलवृत्तांताची संख्या शंभराच्या पुढे आहे. चित्पावन कोकणस्थ ब्राम्हणांनी सुरू केलेला उपक्रम तेवढ्या पोटजातीत बराच फोफावला आणि बहुतेक सर्व आडनावे त्यात आली आहेत. जी आठ-दहा आडनावे राहिली आहेत त्याचे कमी अधिक प्रमाणात प्रयत्न झालेले आहेत. ते पूर्ण मात्र झालेले नाहीत.

पन्नास पाऊणशे वर्षे चित्पावनात चाललेली ही चळवळ आता इतर जाती-जमातींतही पसरत चालली असल्याचे दिसते. चित्पावनांखेरीज इतरांचे कुलवृत्तांतही दखल घ्यावी इतक्या प्रमाणात आहेत. मुंबई विधानसभेचे आणि लोकसभेचे पहिले सभापती झालेले ग. वा. तथा दादासाहेब मावळंकर यांच्या पुढाकाराने-सरदेसाई घराण्याचा इतिहास या नावाने प्रसिद्ध झालेला कुलवृत्तांत हा कऱ्हाडे ब्राम्हणातील पहिला कुलवृत्तांत, मुंबई विधानसभेचे दुसरे सभापती भाऊसाहेब फिरोदियी यांनी 'फिरोदिया कुलवृत्तांत' या नावाने राजस्थानातील फिरोद नावाच्या गावातून महाराष्ट्रात आलेल्या आपल्या घराण्याचा तपशील लिहून ठेवला होता. तो त्यांचे चिरंजीव नवलमल फिरोदिया आणि हस्तिमल फिरोदिया यांनी 'मी कुंदनमल' अशा नावाने छापून काढला आहे. मारवाडी जैन समाजातील हा असा पहिला उपक्रम. सोलापूरचे प्रसिद्ध पत्रकार बाबूराव जक्कल यांच्या पुढाकाराने 'जक्कल कुलवृत्तांत' प्रकाशित झाला. महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या तेलगुभाषिक पद्मसाळी जातीतील हा पहिला कुलवृत्तांत; याच जातीतील दुसरा प्रयत्न जनता सहकारी बँकेचे निवृत्त व्यवस्थापकीय संचालक डॉ. ह. ना. कुंदेन यांनी लिहिलेला 'कुंदेन कुलवृत्तांत' हा आहे. कृषीशास्त्रातील संशोधक आणि निवृत्त प्राध्यापक डॉ. आनंदराव कौतिकराव कोल्हे यांनी 'पिंपरूड कोल्हे कुलवृत्तांत' लिहिला आहे. त्यात त्यांनी पिंपरूड या खानदेशातील गावाशी संबंधित असलेल्या कोल्हे घराण्याचा तपशील दिला आहे. लेवा पाटीदार जातीतील हा पहिलाच कुलवृत्तांत आहे. मुंबईचे प्रसिद्ध दानशूर बांधकाम व्यावसायिक सुधीर निरगुडकर यांनी 'आम्ही निरगुडकर' या नावे प्रकाशित केलेला ग्रंथ देशस्थ ब्राम्हणांतील कुलवृत्तांताचा पहिला प्रयोग

**घराण्यांच्या इतिहास लेखनाची उपयुक्तता**

घराण्यांच्या इतिहास-लेखनाची उपयुक्तता सांगताना **महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार** यांनी म्हटले आहे की, ''घराण्यांचे इतिहास राष्ट्राच्या सर्वांगीण व्यापक इतिहासाला अत्यंत उपयोगी होत. मराठे, ब्राह्मण, प्रभु यांच्याप्रमाणे महार, चांभार, वैश्य इत्यादी सर्व जमातींचे इतिहास तयार व्हावयास पाहिजेत. त्याशिवाय सर्व लोकांचा असा जो सर्वांगीण इतिहास तो सिध्द व्हावयाचा नाही.'' **(हृषिकेश कृष्ण पेंडसे, कोथरूड, पुणे यांच्या 'कुल-वृत्तांत-मार्गदर्शन' या पुस्तिकेतून)**



Marathe Pratishthan

### घराण्यांच्या इतिहासाचे महत्व

"आपल्या घराण्याचा पूर्वापार व खरा इतिहास कळल्यास आपल्या पूर्वजांच्या मनोवृत्ती कशा होत्या, त्यांच्या अंगी मुख्यत्वेकरून कोणते गुण होते, त्यांचे शील कसे होते, त्यांच्या वेळच्या परिस्थितीत व आताच्या परिस्थितीत जो काय फरक असेल तो राष्ट्रहिताच्या दृष्टीने कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे याचा तुलनात्मक दृष्टीने विचार करण्यास असे घराण्यांचे इतिहास बाहेर पडणे अत्यंत जरूरीचे आहे." - **लोकमान्य बाळ गंगाधर टिळक (हृषिकेश कृष्ण पेंडसे, कोथरूड, पुणे यांच्या 'कुल-वृत्तांत-मार्गदर्शन' या पुस्तिकेतून)**

आहे. माजी आमदार आणि सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबूराव बाळाजी घोरपडे यांनी 'घोरपडे घराण्याचा इतिहास' या नावाने ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. मुधोळ, सोंडूर अशा कर्नाटकातील गावांपर्यंत राज्ये स्थापन करणारे घोरपडे घराणे हे पंचकुळी मराठ्यांतील खानदानी घराणे म्हणून प्रसिद्ध आहे. ही कामे करणारी माणसे आपापल्या क्षेत्रातील तालेवार माणसे होती. किंबहुना त्यामुळेच त्यांना असे उपक्रम हाती घ्यावेसे वाटले असावे.

कुलवृत्तांत प्रकाशित होत आहेत ही गोष्ट खरी, तथापि कुलवृत्तांत कशासाठी प्रकाशित व्हायला हवेत, तसे करणे हा भाबडेपणा नाही तर महत्त्वाचे समाजशास्त्रीय काम आहे, हे देखील कुणीतरी ठामपणे आणि सकारण सांगायला हवे. चित्पावन कोकणस्थ ब्राम्हण जातीतील बहुतेक सर्व आडनावांचे कुलवृत्तांत प्रसिद्ध झाले आहेत. ज्यांचे राहिले आहेत ते आणखी काही वर्षात होण्याची चिन्हे आहेत. चित्पावनांची नेमकी संख्या किती हे सांगणे आता कठीण असले तरी साडेतीन टक्क्यांतील अर्धा टक्का त्यांचा असावा, म्हणजे ही संख्या तीन-साडेतीन लाखाच्या पुढे नसावी. या लहानशा का असेना परंतु एका संपूर्ण जमातीतील सर्व व्यक्तींची आणि त्यांच्या घराण्याची नोंद होणे ही जगाच्या समाजशास्त्रीय इतिहासातील अपूर्व आणि अद्वितीय घटना मानावी लागेल, असे असले तरी ही कामे काही फारशी शास्त्रशुद्ध आणि विचारपूर्वक झाली आहेत असे म्हणता येणार नाही. त्यामुळे कुलवृत्तांत कसे असावेत याबाबत समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र अशा विषयातील जाणकारांशी चर्चा करून त्याचा नमुना आणि कार्यपद्धती ठरवायला हवी.

जनगणना किंवा शिरगणती हा प्रकार १८८१ मध्ये सुरू झाला. पहिल्या शिरगणतीचे अहवाल प्रसिद्ध झाले त्या वेळी लोकांनी वेगवेगळ्या जातींची संख्या, त्यांचे प्रमाण, संख्येमुळे समाजजीवनावर होणारे परिणाम यांच्या जाणिवा होऊ लागल्या. देशात इंग्रज किती आहेत, याविषयी असणारे लोकांचे अंदाज प्रत्यक्ष आकडेवारी प्रसिद्ध झाल्यावर किती प्रचंड संख्येला काबूत ठेवतात, याची जाणीव झाली. त्यानंतर प्रत्येक शिरगणतीच्या वेळेला चौकशीचे नवे मुद्दे समाविष्ट झाले, जाती, पोटजाती यांच्या नोंदी होईनाशा झाल्या. तथापि त्या निमित्ताने जमा होणारी माहिती देशाचे नियोजन ठरविताना प्रत्येक क्षेत्रात उपयोगी पडत गेली. शिरगणती हा झाला देशातील सर्वांचा अभ्यास, तर कुलवृत्तांत हा एक आडनावापुरता अभ्यास होतो, तो अधिक समाजशास्त्रीय रीतीने झाला पाहिजे, वेगवेगळ्या शाखांतील लोकांची मदत घेण्याची गरज आहे ती याच दृष्टीने.

अलिकडे सबाल्टर्न हिस्ट्री म्हणजे सामान्य जनांचा इतिहास ही कल्पना रूढ झालेली आहे. आतापर्यंत राजे-रजवाड्यांचा इतिहासच अभ्यासला जात होता. त्यात जनता ही महत्त्वाची असते याची जाणीव वाढली आहे. त्यानंतर काँटेपररी हिस्ट्री म्हणजे समकालीन इतिहास ही कल्पना अलिकडेच निर्माण झाली आहे. या दोन्ही दृष्टींनी कुलवृत्तांत अत्यंत महत्त्वाचे ठरतात. बापट कुलवृत्तांत पाहिला तर त्या आडनावात लष्कर आणि पोलिसखात्यात कर्तबगारी दाखविणारे लोक मोठ्या संख्येने दिसतात. इतकेच नव्हे तर घराणीच्या घराणी दिसतात. केळकर आडनावात गणित आणि विज्ञानातील मोठी प्रगती दिसते. मला स्वतःला राजकारणाविषयी अतिशय कुतूहल आहे. मात्र माझ्या आडनावाचा एकही आमदार किंवा खासदार झालेला आढळला नाही. त्याउलट शांडिल्यगोत्री जोशांमध्ये आमदार, खासदार किंवा मुलकी अधिकारी यांची मालिका दिसते. लष्कर, पोलिस सेवा, मुलकी सेवा, विज्ञान, व्यवसाय, व्यापार, उद्योग, कला, संशोधन अशी क्षेत्रे पाहिली तर त्यात बऱ्याच गंमती आढळतील, साळी आणि कोष्टी या विणकर जातींमध्ये प्रस्थापितांविरुद्धची बंडखोर वृत्ती तसेच कलाकुसर आढळते. सुतार, शिंपी आणि सोनारातही कलावंत आढळतात. माळी कुठल्याही धंद्यात शिरला तरी चोख आणि आर्थिक भान ठेवून अतिशय परिश्रमाने काम करतो. न्हाव्यांमध्ये विलक्षण चतुराई आणि नेमकेपणा दिसतो. हाच प्रकार आडनावातही आढळत असेल तर त्याचा गुणसूत्रांशी आणि वंशशास्त्राशी संबंध आहे का? याचाही अभ्यास करायला ही कामे उपयोगी ठरतील.

जातींच्या जाणिवा निर्माण झाल्या त्या दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात. तोपर्यंत समाजात जाती होत्या आणि त्या असतात हे गृहीत धरूनच समाजजीवन चालत असे. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा

### कुलवृत्तांतातील सूची

वृत्तांतग्रंथ हे संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडतात. त्यात पूर्ण सूची नसेल तर हव्या त्या व्यक्तीची माहिती सुलभतेने काढता येणार नाही. सन १९१४ पासून कुलवृत्तांतग्रंथ प्रकाशित होऊ लागले व उत्तरोत्तर त्यातील सूचीचे प्रकारही वाढत गेले. आरंभीच्या आपटे, बरवे या वृत्तांतग्रंथात् सूची नव्हती. कुलवृत्तांतसंपादक श्री. विष्णूशास्त्री परांजपे यांनी विद्यमान पुरुषव्यक्ती व गणनीय व्यक्ती यांच्या सूचीची प्रथा पाडिली. पुढे कोल्हटकर कुलवृत्तांतात पदवीधरांची सूची, थत्ते वृत्तान्तात वास्तव्यांच्या ठिकाणांच्या सूचि, गोळे वृत्तान्तात दिवंगत व विद्यमान अशा दोन्ही व्यक्तींची सूची, लिमये वृत्तान्तात ऐतिहासिक व्यक्तींची सूची, आठल्ये वृत्तान्तात ऐतिहासिक माहितीतील स्थळांची सूची, गुण्ये वृत्तान्तात ऐतिहासिक उल्लेखांची विषयवार सूचि, भावे वृत्तान्तात प्रसिध्द व पदवीधर स्त्री व्यक्तींची सूची, करंदीकर वृत्तान्तात सर्व स्त्रियांची (भार्या व कन्या यांची) सूची स्वतंत्र दिलेली आहे. मराठे वृत्तान्तात विवाह संबंधांची सूची , पेंडसे वृत्तान्ताच्या दुसऱ्या खंडात संशोधन प्रकरणातील व्यक्तींच्या नावांची सूची असे सूचीचे प्रकार त्यांची उपयुक्तता पटल्यामुळे वाढत गेले आहेत. **(हृषिकेश कृष्ण पेंडसे, कोथरूड, पुणे यांच्या 'कुल-वृत्तांत-मार्गदर्शन' या पुस्तिकेतून)**



Marathe Pratishthan

## कुलवृत्तांत - राष्ट्रीय कर्तव्य

इतिहास हा केवळ राजकीय घडामोडींचा नोंद करणारा विषय राहिलेला नाही. आता इतिहासाच्या राजकीय अंगाबरोबर तो आर्थिक व सामाजिक कक्षेपर्यंत विस्तारित झाला आहे. तसेच तो सामान्य माणसाचीही दखल घेऊ लागला आहे. अशा सामान्य घराण्यातूनही असामान्य व्यक्ती निघू लागल्या आहेत. तेव्हा प्रत्येक कुलाने आपापल्या कुलाचा व कुलसमूहाचा इतिहास लिहून काढून तो प्रसिध्द करणे हे एक राष्ट्रीय कर्तव्य झाले आहे. घराण्यांचे इतिहास देशाच्या सर्वव्यापी इतिहासात उपयोगी असून व्यक्तिमात्रांसही अत्यंत उपयुक्त होत. **(हृषिकेश कृष्ण पेंडसे, कोथरूड, पुणे यांच्या 'कुल-वृत्तांत-मार्गदर्शन' या पुस्तिकेतून)**

आल्या आणि भारतीयांना राजकीय अधिकार देण्याचे विचार सुरू झाले, त्यावेळी संख्या हा महत्त्वाचा घटक ठरणार आणि 'आपला' समुदाय संघटित झाला पाहिजे, हे लोकांना जाणवू लागले. त्यातूनच वेगवेगळया जातीसंघटना किंवा संस्था सुरू झाल्या. शिक्षणाची जाणीव वाढली, हक्कांची जाणीव वाढली. या साऱ्याचा परिणाम दक्षिणेतील श्रीमंत संस्थानिक, इनामदार, जहागीरदार, सरदार या वर्गाला शिक्षण देण्यासाठी, प्रत्यक्षात कारकून, शाळामास्तर असणाऱ्या कनिष्ठ मध्यमवर्गीय किंवा खरे तर गरीब लोकांनीच पोटाला चिमटा घेऊन आपली मुले विद्याविभूषित केली. त्यातून त्यांना आधुनिक प्रकारचे रोजगार मिळाले.

तथापि शिक्षण वाढत गेले तसे रोजगार मागणाऱ्यांची संख्या वाढत गेली आणि स्पर्धा वाढू लागली. संख्येच्या बळावर स्पर्धक प्रभावी ठरू लागले. त्यावेळी आधीपासून सरकारी नोकऱ्यात असणारे शांतपणे त्या स्पर्धेतून दूर झाले. आय.ए.एस., आय.पी.एस. अशा स्पर्धा परीक्षांना बुद्धिमान मराठी मुले जात नाहीत, याची बरीच चर्चा होते. तथापि त्याचा संबंध सामाजिक वातावरणाशी आहे, याची जाणीव लोकांना झालेली दिसत नाही. अठ्ठेचाळीसची जळिते, कूळकायदा आणि संख्यात्मक राजकारण यांचा आपल्यावर प्रतिकूल परिणाम होतो आहे, हे लक्षात घेऊन चित्पावन समाजच सरकारी नोकरीपासून उदासीन झाला. मॅट्रिकला पहिला आलेला मुलगा पुढे आय.सी.एस. होणे हे गृहीतच धरले जाई, चिंतामणराव देशमुख, स. गो. बर्वे किंवा शरद काळे अशी बरीच उदाहरणे दिसतात. तथापि शरद काळे यांच्यानंतर गेल्या एक्केचाळीस वर्षात एकही पहिला आलेला विद्यार्थी मुलकी सेवांकडे वळला नाही. बुद्धिमान मुले आय.ए.एस. कडे वळत नाहीत, याबद्दल हळहळ आणि चिंता व्यक्त करणाऱ्यांनी ही प्रवृत्ती का? याचाही कधीतरी विचार करायला हवा.

संख्यात्मक वातावरणात कोंडी होईल या कारणाने ब्राम्हणांनी अशा क्षेत्राकडे पाठ फिरविली असेलही, तथापि अन्य जाती-जमातींतील पहिले आलेलेही अशा परीक्षांबाबत उदासीन झालेले दिसतात. चित्पावन किंवा अन्य महाराष्ट्रीय ब्राम्हणांपुरते बोलायचे झाले तर ते केवळ स्पर्धा परीक्षांपासूनच दूर झाले आहेत असे नव्हे. ते राजकारणापासून दूर गेले आहेत. सर्व प्रकारच्या सरकारी नोकऱ्यांपासून दूर गेले आहेत. एके काळी कुलकर्णी वतन हे फक्त देशस्थ ब्राम्हणांकडे असे, ते वतन बरखास्त झाले. त्या कामासाठी नेमलेल्या तलाठ्यांची संख्या पाहिली तर त्यात एक टक्काही देशस्थ सापडणार नाही. प्राथमिक शिक्षक, सरकारी कारकून, माध्यमिक शिक्षक या पेशात जाणाऱ्यांचे प्रमाण झपाट्याने कमी होते आहे. घेतले जात नाही, अशी तक्रार करता येईल. तथापि त्या दिशेलाच न वळणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. थोडक्यात सांगायचे झाले तर या वर्गाला राज्यसंस्था किंवा स्टेट या संकल्पनेविषयीच उदासीनता आलेली दिसते.

इतक्या मोठ्या प्रमाणातील रोजगाराच्या संधी मिळत नसल्या किंवा नकोच असल्या तरी या समाजात गरिबी आली असल्याचे दिसत नाही. माधुकरी मागून शिक्षण घेतल्याची हजारो उदाहरणे गेल्या पिढीपर्यंत सांगितली जात. आता अन्नाला मोताद झाल्याने माधुकरी मागण्याची वेळ राहिलेली नाही. 'अनाथ विद्यार्थी गृहा'त राहून शिक्षण घेतल्याचीही अनेक उदाहरणे होती. आज त्याच संस्थेतील विद्यार्थी पाहिले तर तिथे ब्राह्मण मुले हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी सापडतात. देणग्या देणाऱ्यांच्या याद्या पाहिल्या तर मात्र त्यात कनिष्ठ मध्यमवर्गीय ब्राह्मण आढळतात. विविध शिक्षणसंस्थांच्या देणग्या आणि शिष्यवृत्त्यांची यादी पाहिली तर चित्पावन ब्राह्मणांइतकी दानशूर जमात दुसरी कोणतीही नाही, असे आढळेल. या देणग्यांच्या रकमा लहान असतील, पण ती त्यांच्या आयुष्याची सारी पुंजी होती. कोटींनी कमावून लाखात देणग्या देणाऱ्यांपेक्षा हजारात कमावून हजारात देणारे लोक अधिक मोठ्या मनाचे आहेत, हे ध्यानात घेतले पाहिजे. कोणताही कुलवृत्तांत पाहिला तरी हे चित्र दिसते. त्यामुळे सर्व जाती जमातीतील सर्व आडनावांच्या लोकांनी आपापले कुलवृत्तांत प्रसिद्ध करायला हवेत. टॉलस्टॉयच्या 'वॉर अँड पीस' या कादंबरीतील पहिलेच वाक्य 'सर्व सुखी कुटुंबे सारखी असतात पण दुःखी कुटुंबांची दुःखे मात्र प्रत्येकाची वेगळी

## अमेरिकेतील कुलवृत्तांत

पाश्चिमात्य युरोपिय समाजात ''घराण्यांचे इतिहास वा कुलवृत्तान्त'' अत्यंत आस्थेवाईकपणे जतन करण्याची फार पुरातन कालापासून ओढ दिसून येते. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि उपकरणांच्या सहाय्याने अत्यंत साधारण व्यक्तीसही आपल्याजवळच्या आपल्या वडिलांच्या व आईच्या त्रोटक माहितीवरून ४००, ५०० वर्षांपूर्वीचा आपल्या घराण्याविषयीचा, वंशाविषयीचा पूर्वेतिहास शोधणे आणि संग्रहित करणे शक्य झालेले आहे. The Church of Jesus Christ of latter-day Saints, Lake City, Utah, U. S. A. ह्या चर्च संघटनेने आपल्या Genealogical Department तर्फे चालविलेली Morman Family History Library ही अत्यंत अद्वितीय अशी सोय मानावी लागेल. ''Mormans'' हा ख्रिस्ती धर्मातील अनेक पंथांतील एक पंथ आहे.

युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिकेच्या जवळजवळ ८०० लहान-मोठ्या शहरात अशी Genealogical माहिती पुरविणारी केंद्रे आहेत. त्या ठिकाणी संगणक यंत्राच्या सहाय्याने सॉल्ट लेक सिटीच्या मुख्या लायब्ररीत संग्रहित केलेली कोठलीहि माहिती Tapes च्या द्वारे कोणासही विनामूल्य पाहता येते व आपल्या संबंधीची सर्व माहिती टेप करवून घेता येते. **(हृषिकेश कृष्ण पेंडसे, कोथरूड, पुणे यांच्या 'कुल-वृत्तांत-मार्गदर्शन' या पुस्तिकेतून)**



Marathe Pratishthan

असतात' अशा अर्थाचे आहे. इतिहासाचेही तसेच असते. सर्व मोठ्या लोकांच्या यशोगाथा सारख्या असतात. सामान्यांचा इतिहास मात्र वेगवेगळा असतो. कुलवृत्तांत हा असा एकाच सामान्य समूहांचा, त्यांच्या यशापयशांचा इतिहास असतो, तो जतन करायला हवा.

कुलवृत्तांत हे काम अतोनात कष्टाचे, अतोनात खर्चाचे, भलेपणाची अपेक्षा न ठेवता निष्काम कर्मयोग म्हणून करण्याचे आहे. पी.एच.डी. च्या प्रबंधनाला लागणाऱ्या कष्टापेक्षा यात अधिक परिश्रम असतात. मात्र कुलवृत्तांत तयार करणाऱ्यांना कुणी लेखक म्हणत नाही, संपादक म्हणत नाही की संशोधक म्हणत नाहीत. या प्रकारची उपेक्षा होण्याला कुलवृत्तांत तयार होण्याची रीतही जबाबदार आहे. मिळेल ती आणि मिळेल तेवढी माहिती गोळा करून त्याची जंत्री प्रकाशित करण्यापासून कोणती माहिती गोळा करावयाची हे ठरवून काम करण्यापर्यंत सर्व नमुने त्यात पहावयास मिळतात. त्या दृष्टीने देवधर कुलवृत्तांताची नवी आवृत्ती खूप चांगली आहे.

तथापि बहुसंख्य कुलवृत्तांत आधीचे नमुने पहायचे आणि त्यानुसार आपला कुलवृत्तांत तयार करायचा असा प्रकार चालतो. मात्र आधीचा नमुना चांगला किंवा आदर्श आहे की नाही किंवा आदर्श नमुना कसा असावा याबाबत कुणी विचारच करीत नाहीं. याचा परिणाम असा होतो की आपल्या आडनावाबद्दल आस्था म्हणून केलेल्या उपक्रमात अभिमान बाळगावा अशा व्यक्तिंच्या नोंदी सापडत नाहीत. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारे काशीचे महापंडित गागाभट्ट यांचे चुलते कमलाकरभट्ट हे मोठे पंडित होते. त्यांच्या शिष्यांमध्ये अनंतभट्ट चितळे असे नाव आढळते. मात्र आजच्या कोणच्या चितळ्यांचे ते कोण हे समजत नाही. शिवाजी महाराजांच्या तोफखान्यात केळकर आडनावाचा अधिकारी होता. त्याची माहिती केळकर कुलवृत्तांतात नाही. इंग्रजांचे जहाज लुटल्याबद्दल जेरबंद करून आणून विसाजीपंत लेल्याला थोरल्या माधवराव पेशव्यांनी चाबकाचे फटके मारले, त्याला लाखो रुपयांचे दंड ठोठावून धुळीला मिळविले, असा उल्लेख मिळतो. तथापि वसईच्या परिसराचा कारभार पाहणारा विसाजीपंत लेले हा इंग्रजांची वाढती शक्ती ओळखून त्याचा ठावठिकाणा लेले कुलवृत्तांतात नाही. खानदेशातील टोळीप्रमुखांच्या उठावांना आळा घालण्यासाठी पेशव्यांनी धाडलेल्या शिवराम साठे आणि वीरेश्वर गाडगीळ या पराक्रमी वीरांचा उल्लेख साठे वा गाडगीळ कुलवृत्तांतात सापडत नाही. एक तर अशा लोकांचा निर्वंश झाला असणे शक्य आहे किंवा त्यांच्या वंशजांना पराक्रमी व कर्तबगारी पूर्वजांचे विस्मरण झाले असणे शक्य आहे.

त्यामुळे यापुढील काळात होणारे कुलवृत्तांत अधिक शास्त्रशुद्ध झाले पाहिजेत. दर दहा वर्षांनी शिरगणती होते, त्या पद्धतीने सर्व कुलमंडळांनी आपापला आढावा घ्यायला पाहिजे. चित्पावन संघांसारख्या संस्था त्यात पुढाकार घेऊन त्यात सुसूत्रीकरण करू शकतील. किंबहुना सर्वच जातीसंस्थांनी आपापल्या जातीतील आडनावांबाबत अशा प्रकारचे दशवार्षिक आढावे घेतले पाहिजेत. OOO

## सासूची धास्ती

मुंबईची एक मुलगी विवाहानंतर कायम वास्तव्यास वऱ्हाडांत गेली. चांगल्या भल्या मोठ्या वकीलांची सून झाली. सासरी जातांना तिच्या आईने सासरच्या सर्व लहान-थोरांचा आदर व दारच्या गुराढोरांचे संगोपन ममतेने करीत राहण्याविषयी, उपदेशाच्या चार गोष्टी सांगितल्या.

एके सकाळीच, अंगणात सडा संमार्जन करण्यासाठी म्हणून, बादलीभर पाणी व केरसुणी घेऊन सूनबाई पुढील दारीं आल्या, तो काय? पायरीवरच दारच्या कुत्र्याची स्वारी पहुडलेली!! आतां बादली पायरीवर ठेवायची तरी कुठे, केर कसा काढायचा, आणि सडा तरी कसा घालणार? झाली पंचाईत!!

केरसुणीचा बुंधा कुत्र्याच्या पेकाटांत हाणावा, असा विचार डोकावतो, तोंच आईच्या उपदेशाची आठवण झाली, नि सूनबाई कुत्र्याला उद्देशून, गोड नि प्रेमळ आवाजांत म्हणाला, "अहो हडा, तिकडे दूर जाऊन पडा, मी घालतेय सडा, नि तुमच्यावर उडेल शिंतोडा, अन् सासुबाई बोलतील मला फडा फडा!!"

**- प्रेषक : अनंत धोंडो खांबेटे.** (पृ. ६९८), शीव, मुंबई

## पाळणाघर

पाळणाघराची कल्पना तशी
नवीन नाही कुणाला
प्रथम गरज पडली ती
माता देवकीच्या पुत्राला १
देवकीच्या भीतीमागे
कारण वेगळेच होते
यशोदेने मात्र ते
अचूक जाणले होते. २
त्या काळाची गरज
बचाव भगवान श्रीकृष्णाचा
आजच्या काळाची गरज
मोठा प्रश्न मिळकतीचा ३
दोघांनी मिळून ओढायचा
गाडा संसाराचा
त्या बरोबर प्रश्न उभा रहातो
आपल्या गोंडस छकुल्यांचा ४
तसे सोपे नाही बरे
पाळणाघर चालवणे
लोकांचे फारच चुकते
त्याला उणे लेखणे ५
आई बाबांपासून दूर
बाळाचे सुरक्षित रहाणे
इथेच चढते निरागस बाळाच्या
मनावर प्रेमाचे लेणे ६

**- सौ. स्वाती गजानन अभ्यंकर**
(विजय अनंत, पृ. १५५ यांची मुलगी), पुणे.

हसरे हितगुज

## बंगाली 'शेम'

बंगालीत श, ष आणि स ही तीन्ही व्यंजने आहेत. पण तीन्हींचा उच्चार मात्र एकच - श. याबाबत पु. ल. देशपांडे यांनी 'वंगचित्रे' या त्यांच्या पुस्तकात मार्मिक किस्सा दिला आहे- तुम्ही एखाद्या बंगाली माणसाला शुभेच्छा दिल्यात तर तो तत्परतेने म्हणेल, 'शेम टू यू!' काय ही कृतघ्नता!!

## पंडित नेहरूंची रसिकता

इंदिरा गांधी एक दिवस आंब्यांची फोड चोखून न खाता चमच्याने खात होत्या. ते नेहरूंनी पाहिले. ते म्हणाले,'चमच्याने आंबा खाणे म्हणजे हातमोजे घालून प्रेम करण्यासारखे आहे.' अशी रसिकता आगळीच.

**प्रेषक - बंगाली आजोबा, गजानन भास्कर, घाटकोपर.**



Marathe Pratishthan

यापुढील हितगुजचा अंक डिसेंबरमध्ये
म्हणजेच दिवाळीनंतर

सबब आत्ताच ॲडव्हान्समध्ये
सर्व कुलबांधवांना

**मराठे प्रतिष्ठान**
**व**
**हितगुज परिवारातर्फे**

# दीपावली शुभेच्छा!



## या अंकात


१. **आर्थिक विकास आणि भारताची बलस्थाने** ......... पृ.१
प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश सखाराम

२. **मायेचा वटवृक्ष-रामचंद्र पुरुषोत्तम** ..................... पृ.५
श्रीमती शुभदा पांडुरंग जोशी

३. **अमृतमहोत्सवी नाना-गणेश परशराम** .............. पृ.६
सौ. सुहासिनी नारायण

४. **कॉन्टॅक्ट लेन्स तज्ज्ञ-कुंदा मराठे गणात्रा** ............. पृ.७
सौ. कुंदा गणात्रा

५. **उद्योग त्रिमुर्ती-प्रकाश, सुहास व सतीश मराठे** ..... पृ.८
प्रकाश श्रीधर

६. **नैसर्गिक खतासाठी जैविक तंत्रज्ञान-गटचर्चा** ....... पृ.११
वृत्तांत-विनायक केशव, कार्यवाह-मराठे प्रतिष्ठान

७. **कुलवृत्तांत कशासाठी?** ............................... पृ.१२
वरुणराज चिंतामणी भिडे

८. **पाळणाघर (कविता)** .................................. पृ.१५
सौ. स्वाती गजानन अभ्यंकर

९. **सासूची धास्ती** ........................................ पृ.१५
अनंत धोंडो खांबेटे

१०. **कुलवृतांतातील सूची, अमेरिकेतील कुलवृत्तांत** पृ.१३,१४
हृषिकेश कृष्ण पेंडसे

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२), **सभासद वृत्त** (पृ.३,४) आणि **हसरे हितगुज** (पृ.१५) ही नेहमीची सदरे.


बुक पोस्ट

प्रति


**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)


Marathe Pratishthan